# हलो! कोण?

## अर्चना मिरजकर



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# अर्चना मिरजकर

लिखित

दोन अंकी नाटक

# हलो! कोण?

# हलो! कोण?

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला

पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# हलो! कोण? (दोन अंकी नाटक)

अर्चना मिरजकर

A-112, Navnirman CGHS Ltd, Plot 6A, Sector 2, Dwarka, New Delhi - 110075

Phone Number: +91-9811454269

E-mail: archanamirajkar@gmail.com

Blog: Footprints on the sands of time

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा  त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १९ डिसेंबर २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# मनातलं:



खरं तर माझं मन कथेत रमतं. पण ही कल्पना नाटकाच्या स्वरूपातच सुचली. तर हे माझं पाहिलं नाटक. यापूर्वी अनेक कथा लिहिल्या आहेत. एक कादंबरी प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

लहानपणापासून वाचनाची अत्यंत आवड. अगदी महाभारतापासून ते मराठी आणि इंग्रजीतील कितीतरी अभिजात वाङ्मय वाचण्याच भाग्य मिळालं. त्यातून लेखनाची आवड निर्माण झाली. मराठीत व्यंकटेश माडगुळकर, श्रीनिवास कुलकर्णी, गौरी देशपांडे, सानिया हे आवडते लेखक. इंग्रजीत थॉमस हार्डी, व्हर्जिनिया वूल्फ, एमिली ब्रोंत.

आई वडील साहित्यिक. त्यामुळे लहानपणापासूनच आयुष्याकडे साहित्यिक दृष्टीकोनातून बघायचं वाण मिळालेलं. त्यात कधीकधी अज्ञातातून येणारी स्फूर्ती आणि कल्पनाशक्ती मिसळते आणि ही अशी कलाकृती उमलते. दिल्लीत राहून मराठी संस्कृतीशी नातं जोपासण्याचा हा एक प्रयत्न.

अर्चना मिरजकर

# अर्चना मिरजकर यांचं प्रकाशित साहित्य

- ‘नदीकाठी वाळवंटी’, विविध भारतीय भाषांमधील कथांचा अनुवाद, आकांक्षा प्रकाशन, नागपूर.
- ‘ शकुंतला’, नमिता गोखले यांच्या कादंबरीचा अनुवाद, पेंग्विन इंडिया.
- ‘अर्धीमुर्धी कहाणी’, इंदिरा गोस्वामी यांच्या आत्मचरित्राचा अनुवाद, सुविद्या प्रकाशन, सोलापूर.
- ‘छिन्नमस्ता’, इंदिरा गोस्वामी यांच्या कादंबरीचा अनुवाद, सुविद्या प्रकाशन, सोलापूर.
- ‘मातीची माणसे’, विविध भारतीय भाषांमधील कथांचा अनुवाद, सुविद्या प्रकाशन, सोलापूर.
- मी स्वतः लिहिलेल्या कथा अनेक मासिकांतून प्रकाशित.
- इंग्रजी आणि मराठीतून वृत्तपत्रीय लेखन.

# प्रस्तावना

अर्चना मिरजकर यांचे ‘हॅलो, कोण बोलतंय?’ हे नाटक म्हणजे मराठी नाट्यक्षेत्रात त्यांनी आत्मविश्वासाने केलेले महत्वाचे पदार्पण आहे. भगवान महावीरांच्या पदचिन्हांवरती जशी कमळे फुलून आली, तसे अर्चना मिरजकर यांच्या या नाट्यक्षेत्रातील पदार्पणात नाट्य, भावनिकता आणि आध्यात्मिक अनुभूती अशा त्रिदलाचे कमळ फुलून आलेले आहे.

वृंदा नावाच्या एका उच्च मध्यमवर्गीय स्त्रीचे भावविश्व या नाटकात अर्चना मिरजकर यांनी मांडलेले आहे. वृंदा दिल्लीत राहणारी उच्च मध्यमवर्गीय विवाहित स्त्री आहे. नोकरी करणारी आणि शिवाय घर सांभाळणारी. घरात स्वयंपाकीण आहे. पण वृंदा मनातून एक सततचे दुःख बाळगून आहे. बावीस वर्षांपूर्वी तिची तीन वर्षांची मुलगी श्रुती कसल्यातरी तापाने अचानक गेली, तेव्हापासून हे दुःख वृंदाच्या मनात रुजलेले आहे. तिचा नवरा राजेश मात्र या दुःखातून बाहेर पडला आहे. हे असे दुःख उगाळत बसणे म्हणजे त्याला मनाची कमजोरी वाटते. तो वृत्तीने पूर्ण नास्तिक आणि इहवादी आहे. वृंदाचा भाचा आनंद आणि त्याची मैत्रीण सोनाली दोघे अमेरिकेहून आलेले आहेत. आनंदचा जन्मच अमेरिकेत झालेला आहे, तर सोनाली बायोटेक्नॉलॉजीमध्ये संशोधन करण्यासाठी अमेरिकेत गेलेली आहे. अमेरिकेत ते दोघे लग्नाशिवाय एकत्र रहात आहेत. सध्या ते दोघे मिळून वारकरी पंथावर एक माहितीपट तयार करीत आहेत. त्यासाठी पंढरपूरच्या वारीचे चित्रीकरण करण्यासाठी ते नुकतेच पंढरपूरला जाऊन आले आहेत. वृंदाही त्यांच्याबरोबर जाऊन आलेली आहे. सध्या आनंद त्या चित्रीकरणाचे संपादन करतो आहे आणि सोनाली

त्याला मदत करते आहे. आनंदचा मुक्काम वृंदाच्या घरीच आहे; तर सोनाली दिल्लीमध्येच तिच्या आई-वडिलांकडे रहात आहे.

नाटकाच्या प्रारंभी वृंदा आरामात सोफ्यावर वाचत बसलेली आहे. अशा वेळी तिला एक अनपेक्षित फोन येतो. फोनवर बोलणारी व्यक्ती म्हणते की तो पंढरपूरहून विठ्ठल बोलत आहे. आधी वृंदाला हा एक छेडछाडीचा प्रकार वाटतो. कुणीतरी आपल्यावर पाळत ठेवून हा प्रकार करीत आहे, अशी तिची समजूत होते. ती त्याला धुडकावून लावण्याचा प्रयत्न करते. पण नंतर तिची जाणीव उजळते की हा खरोखरीच विठ्ठलाचा फोन आहे. विठ्ठल वृंदाच्या दुखऱ्या मनावर हळुवार फुंकर घालतो. ती जेव्हा भावनावश होते, तेव्हा तिच्या मनातले विचार त्याला आपोआप समजतात. त्याला मुख्यतः तिच्याशी बोलायचे असते देवाच्या स्वरूपाबद्दल. देवाचे स्वरूप आणि पर्यायाने देवाची मूर्ती बदलत्या काळाप्रमाणे बदलायला हवी, असे वृंदाचे मत आहे. पूर्वीच्या काळातील देवाच्या मूर्ती जर त्या त्या काळातल्या हीरोप्रमाणे, म्हणजे राजेरजवाड्यानप्रमाणे परिवेश धारण करणाऱ्या घडवल्या गेल्या, तर आताच्या काळातील देवाच्या मूर्ती आजच्या काळातील हीरोप्रमाणे, म्हणजे जीन्स आणि टी-शर्ट परिधान केलेल्या, हातात मोबाईल आणि डोळ्याला गॉगल असलेल्या अशा का असू नयेत, असा तिचा प्रश्न आहे. प्रारंभीच्या अविश्वासाचा भर संपल्यावर जेव्हा खरोखरीचा विठ्ठलाचा फोन आहे अशी वृंदाची खात्री पटते, तेव्हा ‘देव माझ्याशी बोलला’ या जाणिवेने ती उत्तेजीत व कृतार्थ होते.

राजेशचा मात्र या गोष्टीवर विश्वास बसत नाही. त्याच्या तार्किक विचाराच्या कसोटीवर ही गोष्ट त्याला पटत नाही. त्याच्या मते, वृंदाच्या दुःखी मनाने रचलेले हे कल्पित आहे. जशी मिकी माउस, ड्रकुला, परग्रहावरील जीवसृष्टी ही

काल्पनिक रचिते आहेत, तसेच देव हेदेखील आहे. पण प्रत्यक्षात फोनच्या हिस्टरीमध्ये पंढरपूरचे कोड नंबर असणे, वृंदाच्या हालचालींची तंतोतंत माहिती फोन करणाऱ्याला असणे, विठ्ठलाने एकदा फोनवर सांगितल्याप्रमाणे वृंदाच्या गाडीची क्लचप्लेट खरोखरीच झिजलेली असणे या गोष्टींची स्पष्टीकरणे तो तर्कवादाच्या आधारे देऊ शकत नाही. त्याला तशी गरजही वाटत नाही. वृंदाच्या मानसिक अवस्थेचा फायदा घेऊन कोणीतरी हा बनाव रचलेला आहे, थोड्या दिवसांनी विश्वास बसल्यावर तो बँक अकाऊंट, क्रेडिट कार्ड, एटीएम पिन वगैरे माहिती विचारू लागेल, तेव्हा त्याच्याशी न बोललेलेच बरे, असे म्हणून तो हा विषय झटकून टाकतो.

आनंदला माहितीपटाच्या संपादनात मदत करण्यासाठी सोनाली एक दिवस वृंदाच्या घरीच राहायला येते. सोनालीला वृंदा फारच आवडते. आनंद कडून वृंदाच्या दुःखाची हकीगत कळल्यावर तर तिला वृन्दासाठी काहीतरी करावे असे फार वाटू लागते. लौकरच वृंदाचा पन्नासावा वाढदिवस आहे, हे समजल्यावर ती त्या दिवशी वृन्दासाठी ‘सरप्राईज पार्टी’ करण्याची कल्पना काढते. आनंदला ही कल्पना पसंत पडते आणि दोघे मिळून ‘सरप्राईज पार्टी’ ची आखणी करतात. राजेशला ते विश्वासात घेतात आणि त्याच्याकडून वृंदाच्या कार्यालयातील मित्र मैत्रिणींचे व कार्यालयातील सहकाऱ्यांचे फोन नंबर मिळवतात. सोनाली फोनवरूनच पार्टीच्या पदार्थांची व केकची ऑर्डर नोंदवते. वृंदा कार्यालयातून येण्यापूर्वीच आनंद आणि सोनाली दोघे मिळून हॉलची सजावट पूर्ण करून टाकतात. काही पाहुणे ही येतात. वृंदा कार्यालयातून आल्यावर पार्टीला प्रारंभ होतो. अनपेक्षित अशा या पार्टीच्या आणि त्यातून आपल्या परिवारातील लोकांच्या आपल्यावरील प्रेमाच्या प्रत्ययाने वृंदा अंतर्बाह्य तृप्त होते. या सगळ्या मित्रपरिवारात जीन्स आणि लाल टी-शर्ट घातलेला

एक सावळा तरुण अगदी उत्साहाने सामील झालेला असतो. सगळयांना तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ आग्रहाने खायला देणे, गाणी म्हणण्याचा आग्रह करणे, वृंदा केक कापताना गाण्याचा ताल धरणे, सर्वांना आवडेल असा खेळ काढणे, वृंदाच्या मोबाईल वर सर्वांचे फोटो काढणे वगैरे सगळया गोष्टीतून त्याचा कृतिशील पुढाकार दिसून येतो.जणू तोच या सर्व कार्यक्रमाचा नायक बनून जातो. वृंदाला तो एक वाढदिवसाची गिफ्ट ही देतो. मग सगळेजण निरोप घेऊन निघून गेल्यावर वृंदा, राजेश, आनंद आणि सोनाली विचार करू लागतात की तो होता तरी कोण? वृंदाच्या कार्यालयातील सहकार्यांपैकी तो नव्हता. सोसायटीतल्या शेजाऱ्यापाजाऱ्यानपैकी तो नव्हता. आनंद-सोनालीच्या सहकाऱ्यांपैकी तो नव्हता. त्याने मोबाईलवर काढलेले फोटो तर उत्कृष्ट आलेले असतात पण एकाही फोटोत तो नसतोच. आधुनिक पोशाखात देवाचे रूप पाहण्याची वृंदाची इच्छा, फोनवरील आतापर्यंतची सारी संभाषणे, जीन्स आणि टी-शर्ट या साऱ्याची संगती आता वृंदाच्या ध्यानी येते. आपल्याला हव्या त्या रूपात, अगदी हव्या त्या अवतारात देव आपल्याकडे येऊन गेला, आपल्या घरी जेवून गेला, हे तिला उमगते. आता देवाचा फोन येणार नाही, हेही ती जाणते. वृंदाच्या अशा अवस्थेतच नाटक संपते.

अर्चना मिरजकर यांनी हे नाटक देवाच्या संकल्पनेचा विचार मध्यवर्ती ठेवून गुंफलेले आहे. साहजिकच एका पातळीवर हे चर्चात्मक नाटक आहे. देवाच्या अस्तित्वावर पूर्ण श्रद्धा असलेली वृंदा, देवाचे अस्तित्व नाकारणारा आणि देव ही मिकी माउस, ड्रकुला, परग्रहावरचे निवासी यांच्याप्रमाणे केवळ एक कल्पना आहे असे मानणारा, शास्त्रीय तर्कबुद्धीच्या साच्यात विचार करून देवाच्या अस्तित्वाचे पुरावे मागणारा राजेश, आणि विदेशात जन्मून तिथेच वाढल्यामुळे देवाच्या

अस्तित्वाचे संस्कार झालेला, पण या गोष्टीबद्दल खरी जिज्ञासा बाळगणारा आनंद ही पात्रे म्हणजे या चर्चात्मक मध्यवर्ती आशयसूत्राचे तीन विभिन्न पैलू आहेत. अर्चना मिरजकर यांच्या स्वतःच्या धारणेला अनुसरून त्यांनी वृंदाच्या बाजूने चर्चेचा अंतिम कौल दिलेला आहे; पण दुसरे दोन पैलूही उपेक्षित राहणार नाहीत याची काळजी घेतलेली आहे.

तथापि हे नाटक पूर्णतः वैचारिक पातळीवर स्थिर झालेले नाही. वृंदाच्या व्याकुळ दुःखामुळे त्याला भावनिकतेचाही स्तर लाभलेला आहे. बावीस वर्षे वृंदाने हे दुःख मनात बाळगलेले आहे. तिची जीवनवृत्ती या दुःखाने झाकोळलेली आहे. श्रुतीची आई असण्याचा आश्वासक अनुभव पुन्हा प्राप्त व्हावा यासाठी ती आसुसलेली आहे. देवाच्या आधुनिकीकरणाविषयीचे तिचे विचार आणि ही हरपलेल्या मातृत्वसुखाची असोशी यांच्या समन्वयामुळे चर्चात्मक आशयसूत्रात वैचारिकता आणि भावनिकता यांचा मनोहर संगम झालेला आहे. वृंदा आणि राजेश यांच्या जीवनविषयक वृत्तीतील विरोधामुळे त्यांच्यामध्ये सतत उडणारे खटके, देवाचा फोन येणे या अकल्पित गोष्टीवर विश्वास ठेवणे फार कठीण असल्यामुळे राजेश, आनंद आणि स्वतः वृंदा यांनी रचलेली तऱ्हेतऱ्हेची तर्कटे, वृंदाच्या जीवनवृत्तीवर पडलेले दुःखाचे सावट दूर करण्यासाठी चाललेले आनंदचे प्रयत्न, वृंदा ही एक देवमाणूस आहे अशी शांता स्वयंपाकिणीची भाबडी श्रद्धा यासारख्या संघर्षधारा आशयसूत्रातील मुख्य वैचारिक संघर्षाच्या पूरक म्हणून कार्यरत होतात आणि नाट्यबीज फुलत राहते. “पुराव्यांचा अभाव हा अभावाचा पुरावा होऊ शकत नाही” यासारख्या चमकदार वाक्यांचे स्फुल्लिंग त्यातून निर्माण होतात.

या नाटकातील सगळयाच व्यक्तिरेखा जिवंत आणि रसरशीत आहेत. वृंदाची मध्यवर्ती व्यक्तिरेखा तर परिपूर्ण आहेच. तिच्या मनावर असलेले दुःखाचे दाट सावट, देवावरची गाढ श्रद्धा आणि आधुनिकतेचे विचार यांची सांगड घालण्याची तिची धडपड, राजेशची विचारसरणी पटत नसतानादेखील त्याच्यावरचे आणि आपल्या संसारावरचे तिचे उत्कट प्रेम, भाचा आणि त्याची मैत्रीण यांच्याविषयीची आपुलकी, आपल्यावर प्रेम करणाऱ्यांविषयीची तिची कृतज्ञता, तिच्यातील माणुसकी, तिचे वागणेबोलणे, तिचा लाघवीपणा, तिची अगतिकता, तिचे दमणे, तिची चिडचिड -- सगळे कसे अगदी खरेखरे वाटते. त्यातील जिवंतपणाची स्पंदने जाणवतात. तसेच राजेशचे पात्र. राजेश पूर्णपणे तार्किक विचार करणार आहे. तर्काच्या कसोटीवर न उतरणारे आणि पुराव्याने सिद्ध होऊ न शकणारे असे काहीही स्वीकारायला तो तयार नाही. जन्मतः माणूस राशनल असतो अशी त्यांची श्रद्धा आहे. त्याच्या मते, बालकाच्या निरागस मनाला देव वगैरे काही माहित नसते. ते मोठे होईल तसा समाज त्याच्या डोक्यात हे खूळ भरवतो. वृंदावर त्याचे प्रेम आहे. पण आयुष्यात घडलेल्या दुष्ट घटनेमुळे तिची विचारशक्ती कमकुवत झाली आहे आणि म्हणून ती कशावरही आणि कोणावरही भोळेपणाने विश्वास ठेवते, असे त्याचे ठाम मत बनलेले आहे. तर्कीक्तेच्या विरुद्ध कोणी वागले तर त्याला खूप राग येतो. किंबहुना मनाविरुद्ध झाले की त्याला रागच येत असतो. आनंद आणि सोनाली ही एक लोभस जोडी आहे. अमेरिकेतील वर्क कल्चर, तिथली शिस्त, तिथली नियमबद्धता त्या दोघांच्या इतकी सवयीची झालेली आहे की भारतात ते सगळे तसे नाही, हे पाहून त्यांचा गोंधळ उडत असतो. वृन्दावर मात्र त्यांचे प्रेम आहे. तिच्या आनंदासाठी सतत धडपडणे त्यांना आवडते.

या नाटकात जो मुख्य समरप्रसंग आहे, त्यातील कल्पनेमध्ये खरे म्हणजे नावीन्य नाही. देवाने सगुण रूपात येऊन माणसात मिसळणे व माणसांची कामे करणे मराठी संस्कृतीला अपरिचित नाही. महीपतिबुआ ताहराबादकर यांचा ‘भक्तविजय’ ग्रंथ अशा घटनांनी भरलेला आहे. विठ्ठल नामदेवांनी दाखवलेला नैवेद्य भक्षण करतो, तुकारामांच्या बायकोच्या पायात रुतलेला बाभळीचा काटा काढतो, जनाबाईंच्या शेणी थापून देतो, एकनाथांच्या घरी कावडीने पाणी भरतो, कबीराचे शेले विणून देतो या गोष्टी मराठी माणसाला माहीत असतात. परंतु अर्चना मिरजकर यांनी या नाटकात त्या देवाच्या मानुषीकरणाला एकीकडून देवाच्या रूपातील आधुनिकीकरणाच्या वैचारिक चर्चेची जोड देऊन आणि एकीकडून नाटकातील मुख्य पात्राच्या भावनिकतेशी त्याचा बेमालूम सांधा जोडून समरप्रसंगातील नाट्य खुलवत नेले आहे.

तपशीलाच्या दृष्टीने पाहता, नाटकातील विविध संदर्भ परिपूर्णतेला नेण्याचा कटाक्ष लेखिकेने पाळलेला आहे. आनंद राजेशला एकदा माहितीपटाच्या निर्मितीमधील विविध बाबी उलगडून सांगतो, तो भाग उदाहरणादाखल पाहावा. माहितीपटाच्या निर्मितीमधील विविध कौशल्ये आणि प्रक्रिया यांचा तपशील तिथे परिपूर्ण रीतीने आलेला आहे.

एका महत्त्वाच्या गंभीर विषयाला या नाटकाच्या आशयसूत्रात लेखिकेने केंद्रस्थानी ठेवलेले आहे. देव आहे की नाही, असला तर तो निर्गुण निराकार आहे की सगुण साकार आहे, तो माणसाच्या रुपात अवतरतो का, अवतरलाच तर त्याचा चेहरामोहरा कसा असतो, त्याची वेषभूषा कशी असते, मूर्ती हे त्याचे प्रतीक असेल तर तिच्या ठायी लक्षावधी माणसांच्या श्रद्धा आणि भक्तिभावना कशा केंद्रित होतात,

हे तत्त्वज्ञानाला आणि अध्यात्मशास्त्राला शतकानुशतके पडलेले प्रश्न आहेत. परमेश्वराची रूप 'नेति नेति' असेच असले, तरी यातील बऱ्याचशा प्रश्नांची उत्तरे तत्वज्ञानाने आणि अध्यात्मशास्त्राने दिलेली आहेत. परमात्म्याचे मूळ स्वरूप जरी निर्गुण निराकार असले तरी भक्ती आणि श्रद्धा या दोन घटकांमुळे तो सगुण साकार रूपामध्ये ही प्रतीत होऊ शकतो. "तुज सगुण म्हणो की निर्गुण रेl सगुण निर्गुण एकु गोविंदु रे" ही संतांची प्रत्यक्ष अनुभूती होती. कैवल्याचा गाभा, तो हा उभा विटेवरी " हे त्यांनी जाणले होते. निर्गुण निराकार स्वरूपाचे भान ठेवून सगुण साकार रूपाच्या प्रेमाची गोडी त्यांनी चाखलेली होती. "म्हणौनी अध्यात्मशास्त्री इये l एक अंतरंगाचि अधिकारिये" हे या अनुभवामागील सूत्र होते. 'भाव तेथे देव' या साध्यासोप्या वाक्यप्रचारात या सूत्राची कळ समाविष्ट आहे. ज्याची जशी श्रद्धा असेल तसा त्याला त्याचा देव भेटतो. कुणाला मूर्ती हाच खरा देव वाटेल आणि त्या मूर्तीचे भजन पूजन व कोड कौतुक करीत रहावेसे वाटेल, कोणाला अणुरेणूत भरून राहिलेल्या व चराचर व्यापून शिल्लक उरणाऱ्या परमतत्वाचे मूर्ती हे प्रतीक वाटेल. मूर्तीचे दर्शन घेताना त्याला त्या विशाल परम तत्वाचीच आठवण होईल. तर कोणाला मूर्तिपूजा हा बावळटासारखा बहुलाबाहुलीचा खेळ वाटेल. ज्याचा त्याचा देव त्याच्या त्याचा पुरता खराच असतो. त्याचीच त्याला अनुभूती येऊ शकते आणि येत असते. मूर्तीच्या आधुनिकीकरणासंबंधीचे वृंदाचे विचार हेदेखील क्रांतिकारक अथवा अगोचर नाहीत. समकालीन हीरोवर देवाचे रुप बेतले गेल्याचे आपल्या परिचयाचे आहेच. भारत-पाकिस्तान युद्धाच्या वेळी गणेशोत्सवात संपूर्ण लष्करी अधिकाऱ्याच्या परिवेशातील गणेशमूर्ती आपण पाहिलेल्या आहेतच.


अर्चना मिरजकरांचे वैशिष्ट्य हे आहे की या सगळया परिचित विचारप्रवाहांचे धागे एका मनस्वी व्यक्तिमत्वाच्या भावाविश्वामध्ये गुंफून त्यांनी या नाटकात एक प्रभावी नाट्यानुभव निर्माण केला आहे. अध्यात्माला नेहमीच्या जीवनानुभवाशी जोडून घेतले आहे. ईश्वरी आश्वासकतेचा दिलासा गोंधळलेल्या कष्टी मनाला दिलेला आहे. “असे कधी घडते का” असा प्रश्न हे नाटक आपल्या मनात उभा राहू देत नाही, एवढे निश्चित.

- डॉ निशिकांत मिरजकर

निवृत्त प्राध्यापक

दिल्ली विद्यापीठ, दिल्ली

'पिढ्यानुपिढ्या विठ्ठलभक्तीची परंपरा जागृत ठेवणाऱ्या असंख्य वारकर्यांना अर्पण'



# हलो, कोण बोलतंय?

## पात्र परिचय

वृंदा: दिल्लीत राहणारी उच्च मध्यम वर्गीय नायिका

राजेश: वृंदाचा नवरा

आनंद: वृंदाचा भाचा

सोनाली: आनंदची प्रेयसी

शांताबाई: वृंदाच्या घरची स्वैपाकीण

मीना: शांताबाईची शेजारीण

इतर: पार्टीला आलेले पाहुणे

# अंक पहिला

# प्रवेश पहिला

पडदा वर जातो. रंगमंचावर एक उच्च मध्यमवर्गीय घरातील दिवाणखाना, सोफा सेट, टी.व्ही., पुस्तकांचे रॅक, भिंतीवर सुंदर चित्रे, छोट्या टेबलांवर फोटो फ्रेम, एका कोपऱ्यात गणपतीची मूर्ती. सोफ्यावर एक मध्यम वयीन स्त्री काही वाचत आरामात पाय पसरून बसली आहे. ही वृंदा. प्रगल्भ, आधुनिक व्यक्तिमत्व. दिवाणखान्यातील म्युझिक सिस्टम वर मंद आवाजात शास्त्रीय संगीत लागलेलं आहे. इतक्यात तिचा सेलफोन वाजतो. दोन-तीन रिंग झाल्यावर वृंदा वाचन चालू ठेवून फोन उचलते.

वृंदा: “हलो”

फोनवरून आवाज: “नमस्कार, वृंदा मॅडम. तुम्हाला थोडी सवड असेल तर जरा बोलायचं होतं.” (आवाज अतिशय प्रसन्न आणि प्रभावी).

वृंदा: “आपण कोण?”

आवाज: “मी विठ्ठल.”

वृंदा: “विठ्ठल कोण? कुठून बोलताय?”

आवाज: “पंढरपूरहून.”

वृंदा: “अहो पंढरपुरात शेकडो विठ्ठल असतील. मी कोणा विठ्ठल नावाच्या व्यक्तीला ओळखत नाही.”

आवाज: “हो बरोबर आहे. ओळखणार कसं? आला होता तेव्हा भेटला देखील नाहीत.”

वृंदा: "पण तुम्हाला कसं कळलं मी पंढरपूरला आले होते म्हणून? आणि माझा नंबर कोणी दिला तुम्हाला?"

आवाज: "ते जाऊ द्या ना. मी काय म्हणतोय ..."

वृंदा: "हे बघा, हा नंबर 'डू नॉट डिस्टर्ब' लिस्ट मध्ये आहे. यावर कोणतेही मार्केटिंगचे कॉल..."

आवाज: "अहो पण मी मार्केटिंग कुठे करतोय? मला एका महत्वाच्या विषयावर तुमच्याशी बोलायचंय."

वृंदा: "बरं बोला. कशाला फोन केलात?"

आवाज: "ते तुम्ही आणि तुमचा भाचा आनंद बोलत होता ना त्या विषयावर बोलायचंय जरा तुमच्याशी."

वृंदा: "तुम्ही ... तुम्ही मला ... आणि आनंदला ओळखता?"

आवाज: "मी सगळयांनाच ओळखतो. ते जाऊ दे... मी काय.."

वृंदा: (संगीत बंद करते.) "काय बोलत होतो आम्ही? आणि त्याचा तुमच्याशी संबंध काय?"

आवाज: "माझ्या बद्द्लच बोलत होता ना तुम्ही!"

वृंदा: "तुमच्याबद्द्ल? हे पहा, मला वाटतं तुमचा काहीतरी गैरसमज झाला आहे. मी तुम्हाला ओळखतही नाही, मग तुमच्याबद्द्ल बोलण्याचा प्रश्नच कुठे येतो? सारी हं, मला वाटतं तुमचा रॉंग नंबर लागलाय."

आवाज: "थांबा थांबा, वृंदा मॅडम. मी आठवण करून देतो तुम्हाला. गेल्या महिन्यात वारीचं शूटिंग करायला आनंद आणि त्याच्या टीम बरोबर तुम्ही पंढरपूरला आला होता ना. तेव्हा एकादशीच्या दिवशी ते

नदीच्या घाटावरची गर्दी बघून नाही का आनंद वैतागला होता. दर्शनाची रांग बघून तुम्ही दर्शन न घेताच परतलात. तेव्हा या एका दगडाच्या मूर्तीला बघायला एवढे लाखो लोक कशाला वेड्यासारखे कामधंदा सोडून असल्या जीवघेण्या गर्दीत सामील होतात, असं म्हणाला होतं ना तो."

वृंदा: "हो. पण हे आमचं बोलणं पंढरपूरहून परतताना गाडीत झालं. तुम्हाला कोणी सांगितलं ते?"

आवाज: "ते जाऊ दे. पण त्यावर तुम्ही जे म्हणालात आणि दिल्लीला परत आल्यावर तुम्ही जे चिंतन केलंत ते आवडलं मला."

वृंदा: "आनंदनं सांगितलं का तुम्हाला ? तुम्ही आनंदला ओळखला का ?"

आवाज: "मी सगळयांनाच ओळखतो, पण ते जाऊ दे. मी काय म्हणतो, ते तुम्ही म्हणलात ना..."

(आतल्या खोलीतून राजेशचा प्रवेश. हा वृंदाचा नवरा. समवयस्क. झोपेतून उठून आल्यासारखा अवतार.

राजेश: "किससे बात कर रही हो?"

वृंदा: "पता नहीं, कोई महाराष्ट्र से बोल रहा है."

(राजेश सोफ्यावर जाऊन बसतो. बाजूच्या टेबलावर पडलेले मासिक उचलून चाळू लागतो.)

आवाज: "सॉरी मॅडम. आपल्या बोलण्याने सरांची झोप मोड झालेली दिसते. बरंय, पुन्हा केव्हातरी बोलू या विषयावर."

(फोन बंद होतो.)

राजेश: “मैं तो सो गया था. तुम्हारे बोलने से नींद खुल गयी.”

वृंदा: “हां. मैं भी सोने ही जा रही थी. लेकिन आनंद नहीं आया अभी तक.”

राजेश: “बता कर गया था कब आयेगा ?”

(एवढ्यात बेल वाजते. वृंदा दार उघडते. एक स्मार्ट २५-२६ वर्षाचा तरुण आत येतो.)

आनंद: “हाय मावशी. हाय अंकल.”

वृंदा: “ये आनंद. आताच मी म्हणत होते की अजून कसा नाही आलास तू. आज उशीर झाला. काही खाल्लंस का? नाहीतर जेवण तयार आहे. गरम करू?”

आनंद: “डोंट वरी मावशी. मी खाल्लं बाहेर. घरी येइपर्यंत उशीर झाला असता.”

वृंदा: “संपलं का एडिटिंगचं काम?”

आनंद: “छे ग! अजून तीन-चार दिवस तरी लागतील असं वाटतंय. ते लोक पटापट कामच करत नाहीत. आज मी त्यांच्याबरोबर बसून बघितलंना... किती वेळ वाया घालवतात ते आपसात बोलण्यात. जरा काम सुरु केलं आणि कामाला गती आली की शेजारचा काहितरी बोलतो... मग हा काम करणारा माणूस त्याच्याशी बोलायला लागतो. अशीच पाच – सात मिनिटं जातात. पुन्हा याचं लक्ष कामावर आलं की पलीकडची मुलगी काहीतरी प्रश्न विचारते. मग हा सीटवरून उठून तिची अडचण दूर करायला जातो. मधेच चहा काय येतो. कुणीतरी बाहेरचं येऊन गप्पा मारत बसतं... असं करत पंधरा मिनिटांचं काम करायला यांना दोन तास लागतात.”

वृंदा: “अरे त्यांना कुठे काम आटोपून अमेरिकेला परत जायचंय? आजचं काम उद्या केलं काय किंवा आणखी दोन दिवसांनी केलं काय, कुठे बिघडतं त्यांचं?”

राजेश: “तुम ऐसा करना आनंद, सारा raw footage लेकर US चले जाना. फिर वहीं करवाना editing.”

आनंद: “I might have to do that Uncle, if the work is not over by the end of the month. मावशी, उद्या सोनाली येईल माझ्याबरोबर.”

वृंदा: “हो का? अरे वा! मग जेवायलाच ये म्हणावं.”

आनंद: (थोडासा अवघडून) “हो, म्हणजे उद्या इथेच राहील ती. मग परवा सकाळी माझ्याबरोबरच स्टुडिओत जाईल... चालेल ना?”

वृंदा: (राजेशकडे कटाक्ष टाकून) “हो ... म्हणजे ... चालेल की! नाहीतरी तुम्ही तिकडे अमेरिकेत एकत्रच राहता की!”

आनंद: “Thanks! गुड नाईट मावशी. गुड नाईट अंकल.”

-----------------*------------------

# प्रवेश दुसरा

वृंदाचा दिवाणखाना. स्टेजवर मंद प्रकाश. वृंदा किल्लीने दार उघडून आत येते. दिवे लावते. स्वतःशीच बोलते.

वृंदा: "राजेश आला नाही वाटतं अजून. लवकर ये म्हणून सांगितलं होतं."

(हातातली पर्स आतल्या खोलीत ठेवून पुन्हा दिवाणखान्यात येते. बैठक नीटनेटकी करते. सोबत आणलेली फुलं फ्लॉवर पॉट मध्ये ठेवते. इतक्यात बेल वाजते. वृंदा दार उघडते. राजेश आत येतो.)

वृंदा: "मला वाटलं मी यायच्या आधी आलेला असशील. लवकर कपडे बदलून फ्रेश हो. आनंद आणि सोनाली येतीलच आता."

राजेश: "आठ वाजेपर्यंत काही येणार नाहीत ते, आधी मस्तपैकी चहा घेऊ आपण."

वृंदा: "काहीतरीच काय! पाहुणे यायच्या आधी का कोणी चहा घेतं? ते दोघं आल्यावर करू."

राजेश: "आता रहायलाच तर येणार आहेत दोघं, चहाच काय, डिनर, ब्रेकफास्ट सगळंच आलं."

वृंदा: "तुला काही प्रॉब्लेम आहे का त्यांनी इथे येऊन राहण्यात?"

राजेश: "मला काय प्रॉब्लेम असणार?"

वृंदा: "नाही, आनंद अमेरिकेहून आल्यापासून बघलेय मी. तुला सारखा राग येत असतो. येता जाता टोमणे मारत असतोस. काल पण त्याला म्हणालास, सगळं व्हिडियो फूटेज अमेरिकेला घेऊन जा, तिथे एडिटिंग कर म्हणून. का? काय प्रॉब्लेम आहे तो इथे राहिला तर?"

राजेश: “प्रॉब्लेम काय? मागच्या महिन्यात आनंद आला, आज सोनाली येईल, उद्या त्यांचे मित्रमैत्रिणी. मग तू जिवाचा आटापिटा करून त्यांच्यासाठी हे कर, ते कर, करणार. आणि बरोबर मलाही कामाला लावणार.”

वृंदा: “मग काय झालं थोडं जास्त काम केलं तर? भुतासारखं दोघंच घरात राहतो एरव्ही. श्रुती असती तर नसतं केलं तिच्यासाठी? तिच्या मित्रमैत्रिणीसाठी?”

राजेश: “हे तुझं नेहमीचंच blackmail...” (रागाने आत निघून जातो).

वृंदा: “Blackmail? Blackmail आहे हे?” (सोफावरची कुशन त्याच्या दिशेने फेकते). “नुसतं श्रुतीचं नाव काढला तरी ...” (सोफ्यावर बसून चेहरा हाताने झाकून आतल्या आत रडू लागते. फोन बाजतो. डोळे पुसून वृंदा फोन उचलते.)

वृंदा: “हलो!”

आवाज: “इतकं हळवं व्हायचं नसतं वृंदा!”

वृंदा (आवेशाने): “विनाकारण राग राग करतो तो सारखा... कोणी आलं गेलेलं खपत नाही...”

आवाज: “जाऊ दे ना! तुम्ही कशाला एवढा त्रास करून घेताय? आनंद आणि सोनाली येताहेत ना! मस्त एन्जॉय करा त्यांच्या बरोबर!”

वृंदा (एकदम भानावर येऊन): “हलो! कोण बोलताय तुम्ही?”

आवाज: “मी विठ्ठल.”

वृंदा: “परवा पण केला होतात न तुम्ही फोन. उगीचच्या उगीच...”

आवाज: “उगीच नाही... तुम्ही एकदम इमोशनल झाला होता, म्हणून,”

वृंदा: “तुम्हाला कुणी सांगितलं मी इमोशनल झाले होते म्हणून? तुम्ही stalking करताय का माझं? माझ्यावर पाळत ठेऊन...”

आवाज: “नाही हो वृंदा मॅडम... तुम्ही एकदम भावनावश होऊन माझी आठवण केलीत न ... श्रुती आठवली की मी देखील नेहमीच आठवतो न तुम्हाला...”

वृंदा: “तुम्ही? कोण आहात तुम्ही?”

(बेल वाजते.)

वृंदा: “हलो! हलो!”

(पलीकडून काही आवाज येत नाही. वृंदा फोन खाली ठेवून दार उघडते. आनंद आणि सोनाली प्रवेश करतात. सोनाली स्मार्ट, प्रसन्न व्याक्तिमत्व.)

वृंदा: “या, या, मी वाटच बघत होते.”

सोनाली: “नमस्कार मावशी.”

आनंद: “केव्हा आलीस ऑफिसमधून?”

वृंदा: “झाला अर्धा तास. ये सोनाली. स्टुडिओमधूनच येताय का? बसा, मी चहा करते.”

आनंद: “तू बस ना मावशी सोनालीशी बोलत. मी आणतो चहा करून.”

(राजेश प्रवेश करतो.)

सोनाली: “नमस्कार अंकल.”

राजेश: “नमस्कार.”

वृंदा: “बरं झालं तू आलीस. त्यामुळे आनंद ही लवकर घरी आला आज. नाहीतर त्याच्याशी बोलायला वेळंच मिळत नाही.”

सोनाली: “हो ना! इथे भारतात commuting मध्येच आपला फार वेळ जातो. तुमचं घर छान आहे मावशी. अगदी माझी आई ठेवते तसं. आमच्या अमेरिकेतल्या घरात खूप पसारा असतो.”

(बेल वाजते. स्वैपाकीण शांता प्रवेश करते.)

वृंदा: “तू बस हं, आरामात. मी स्वयंपाकाचं शांताला सांगून येते.”

(आत जाते)

आनंद: “मी जरा फ्रेश होऊन येतो. (हॉलच्या मागील जिन्याने वर जातो).

राजेश: “तू पण सिनेमा... documentary हेच करतेस का?”

सोनाली: “नाही अंकल. मी biotechnology मध्ये पी एच डी करतेय. हौस म्हणून आनंदला documentary करायला मदत करते.”

राजेश: “Biotechnology? अरे वा! किती वर्ष झाली अमेरिकेत जाऊन?”

सोनाली: “आत्ता सलग चार वर्ष. लहानपणी, काही वर्ष होते तिथे.”

राजेश: “काय, विषय काय आहे पीएच डी चा?”

सोनाली: “Swarming techniques adopted by E. Coli.”

राजेश: “अरे बाप रे!”

(राजेश बराच इम्प्रेस्ड आहे.)

राजेश: “मग आनंद कुठे भेटला?”

सोनाली: “युनिवर्सिटीत. आमचा भारतीय विद्यार्थ्यांचा ग्रुप आहे. अर्थात आनंद अमेरिकन सिटिझन आहे पण आमच्या ग्रुप मध्ये ही असतो.”

(वृंदा चहा, खाण्याच्या बशा घेऊन येते. आनंद जिन्यावरून खाली येतो.)

वृंदा: “कुठवर आलं आज काम? काही प्रगती आहे का नाही?”

आनंद: “हो, आज संपवलं बरचसं एडिटिंग. आता शेवटच्या पंधरा वीस मिनिटांच्या फिल्मचं काम उरलंय.”

वृंदा: “बरं झालं बाबा. परत जाण्याच्या दिवसापर्यंत सगळं मनासारखं झालं काम की बरं होईल.”

(सर्वांना चहा खाणे देते.)

सोनाली: “मस्त आहेत भजी. तुम्ही केली?”

वृंदा: “नाही गं! कोपऱ्यावरच्या दुकानातून मागवली. शांताबाई करेल आता आनंदच्या आवडीचा स्वयंपाक. तुला काय आवडतं?”

(सोनालीचा फोन वाजतो.)

सोनाली: “आईचा फोन आहे.”

(फोन उचलून बोलत व्हरांड्यात जाते.)

वृंदा: “अरे आनंद, फोन वरून आठवलं. त्या तुझ्या विठ्ठलचा फोन आला होता. काल ही आला होता आणि आत्ता तुम्ही यायच्या आधी...”

आनंद: “विठ्ठल कोण?”

वृंदा: “अरे तूच दिलास ना त्याला माझा नंबर?”

आनंद: “मी? काय म्हणत होता तो?”

वृंदा: “काही तरी महत्त्वाचं बोलायचंय म्हणाला. तुम्ही पंढरपूरला आला होता पण न भेटताच गेलात असं काहीतरी म्हणत होता...”

आनंद: “पंढरपूरहून बोलत होता?”

वृंदा: “तिथे तू काही काम दिलं होतंस का कुणाला?”

आनंद: “Not really.”

वृंदा: “जाऊदे. करेल परत.”

(सोनाली परत येऊन बसते.)

सोनाली: “आईने तुम्हा दोघांना आग्रहाचं निमंत्रण दिलंय घरी येण्याचं.”

वृंदा: “हो, नक्की येऊ. खरं तर आज त्यांनाही बोलवायला पाहिजे होतं आपण जेवायला.”

सोनाली: “आज ते दिल्लीत नाहीएत मावशी. मथुरेला गेलेत.”

वृंदा: “मथुरेला कशाला?”

सोनाली: “जात असतात मधून मधून. मलाही चल म्हणत होते. दोन दिवस मथुरा, एक दिवस वृन्दावन असं करून येतील परवा दिवशी.”

राजेश: “बरेच धार्मिक दिसतात तुझे आई–बाबा!”

सोनाली: “हो! आमच्या घरी सगळे कृष्ण भक्त आहेत.”

राजेश: “म्हणजे पूजा वगैरे पण करतात?”

सोनाली: “हो, अगदी साग्रसंगीत. आता रिटायर झाल्यापासून तर त्यांना भरपूर वेळही आहे. आत्ता गेलेत ‘मला आनंदशी लग्न करण्याची बुद्धी दे’ म्हणून कृष्णाला सांगायला.”

वृंदा: “हो, बरोबरच आहे. माझा पाठिंबा आहे त्यांना.”

सोनाली: “आता घरी आल्यावर प्रवचन ठेवणार आहेत. त्यासाठीच तुम्हाला निमंत्रण देणार आहेत.”

राजेश: “म्हणजे अमेरिकेला शिकायला गेल्यावरच तुझी सुटका झाली म्हणायची.”

सोनाली: “सुटका? कशापासून?”

राजेश: “हेच, कर्मकांड... धार्मिक विधी!”

सोनाली: “कर्मकांड फारशी करत नाही आम्ही... आणि कुणावर ते करण्याची जबरदस्ती पण नसते. शिवाय मी ही कृष्णभक्त आहे.”

राजेश: “तू ही? मग ते biotechnology आणि या देव-देवतांची सांगड कशी घालायची? पीएच डी च्या थेसिसमध्ये creationism वर पण एक प्रकरण लिहिणार का?”

सोनाली: “मी creationism मानत नाही अंकल. अमेरिकेत बरेच लोक मानतात असं एकलं आहे.”

राजेश: “आणि तू आनंद? तू तर अमेरिकेतच जन्मलास, वाढलास. तुझा आहे का देवावर विश्वास?”

आनंद: “I am agnostic अंकल. देवाविषयी माझं काही ठाम मत नाही.”

राजेश: “असले कसले नवीन पिढीचे लोक तुम्ही? एकविसाव्या शतकातही देव, तीर्थक्षेत्रे यांच्यावर विश्वास आहे तुमचा?”

वृंदा: “सगळे लोक तुझ्यासारखे नास्तिक नसतात राजेश.”

राजेश: “मुळात सगळे नास्तिकच असतात. माणसाच्या मेंदूत rational विचार करण्याची क्षमता उपजतच असते. लहान मुलांना कुठे माहिती असतो देव वगैरे? पण आई-बाप, समाज भरवतो हे खूळ डोक्यात त्यांच्या. मग कितीही विज्ञान शिकवा, देवाचं भूत काही त्यांच्या मानगुटीवरून उतरत नाही.”

वृंदा: “काय हे राजेश? सोनाली पहिल्यांदा आपल्या घरी आली आहे, आणि तू वाद काय घालत बसला आहेस?”

राजेश: राहिलं! (भजी उचलत) आपण भजी या विषयावर बोलू.”

सोनाली: (हसून) “तुम्हाला आवडतात का? मला खूप आवडतात. पण अमेरिकेत नाही मिळत. आणि घरी करायला बहुतेक वेळ नसतोच.”

वृंदा: (चहाचे कप गोळा करत) मी बघते शांताबाईचा स्वैंपाक कुठवर आला.” (आत जाते.)

(आनंद आणि सोनाली उरलेल्या बशा घेऊन आत जातात. रंगमंचावर हळूहळू अंधार.)

# प्रवेश तिसरा

(सकाळची वेळ. उगवत्या सूर्याचा प्रकाश. पक्ष्यांचे आवाज. वृंदाच्या घरातील दिवाणखाना. वृंदा सोफ्यावर चहा पीत बसली आहे. नाईट गाऊन मध्ये, हातात वर्तमान पत्र. आतून राजेश प्रवेश करतो. अंगात track सूट. पायात चालायचे बूट. वृन्दाकडे पाहून आश्चर्याने;)

राजेश: “हे काय? तयार नाही झालीस अजून?”

वृंदा: “नाही, आज नाही येत मी फिरायला. झोप नाही लागली रात्री नीट. अंग असं जड जड वाटतंय.”

(राजेश खांदे उडवून निघून जातो.)

वृंदा: (थोडावेळ राजेश गेला त्या दिशेने पहात राहते. मग थोडीशी हताश होऊन) “साधं, रात्री का झोप लागली नाही हे सुद्धा विचारायचं मनात येत नाही याच्या. नुसता राग राग... नाही फिरायला गेले, आला राग...”

(फोन वाजतो. वृंदा उचलते.)

वृंदा: “हलो!”

आवाज: “का नाही लागली झोप?”

वृंदा: “हलो? राजेश?” (विलक्षण गोंधळलेली आहे.)

आवाज: “फार विचार केला की नाही लागत झोप.”

वृंदा: “हलो, हलो! कोण बोलतंय? (घाबरून गेली आहे.)

आवाज: “विठ्ठल!”

वृंदा: “कोण आहात तुम्ही? (अत्यंत घाबरून उठते. इकडे तिकडे बावरलेल्या नजरेने बघते... जणू एखादा लपवलेला कॅमेरा शोधत असावी). पाळत ठेवताय माझ्यावर? (राग, भिती यांनी संमिश्र आवाज.) Stalking करतोयस तू? कुठून एकतो आहेस माझं बोलणं?”

आवाज: “Relax वृंदा मॅडम! अहो stalking, पाळत वगैरे काही नाही. मी फक्त फोन केलाय तुम्हाला. थोडं निवांत बोलण्यासाठी. दर वेळेला मी फोन केला की काही ना काही व्यत्यय...”

वृंदा: “माझं बोलणं कसं ऐकलंस मग? मला झोप लागली नाही हे मी तुझा फोन येण्याआधी...”

आवाज: (थट्टेवारी नेण्याच्या सुरात) “हां, ते? भावना विवश होऊन बोललेलं मला सगळ ऐकू येतं. त्या लहरी देखील संदेशवहनाचं कार्य करतात.”

वृंदा: (स्वतःवरच चिडून) “मी तरी कशाला बोलतेय तुझ्याशी...”

आवाज: “अं हं हं... वृंदा मॅडम, फोन बंद करू नका.”

वृंदा: (त्रासिकपणे) “कोण आहेस तू? काय हवंय तुला?”

आवाज: “मी पंढरपूरहून विठ्ठल बोलतोय. अहो काही विशेष नाही. थोड्या गप्पा मारायच्या होत्या.”

वृंदा: “पुन्हा तेच. कोण विठ्ठल?”

आवाज: “पांडुरंग. अठ्ठावीस युगांपासून विटेवर उभा असणारा, पुंडलिकाच्या भेटी साठी आलेला.”

वृंदा: (स्वतःशीच) “काय वेडाबिडा आहे की काय?”

आवाज: “नाही हो. अगदी व्यवस्थित शुद्धीवर आहे. आणि खूप बोलायचं पण आहे. पण कुणाला सवडंच नाही बोलायला माझ्याशी. अखंड बोलणारा भक्त भेटून शेकडो वर्षं उलटून गेली. एखादा ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, जनाई, मुक्ताई, सखू असं कोणीतरी भेटेल म्हणून खूप वाट पाहतो. पण कोणी तेवढा वेळच देत नाही मला. नाही, माझं दर्शन घ्यायला लाखो लोक येतात. पण कोणी संवादच साधत नाहीत. वारी करताना देखील आपल्या संसाराच्या चिंता, भांडण-तंडे, व्यापार-उदीम, शेती-भाती, मार्गातील व्यवस्था, जेवण, दर्शनाची रांग, परतीचा प्रवास असे नाना विषय त्यांच्या डोक्यात असतात. माझा विचार क्वचितच मनात असतो त्यांच्या. शिवाय आजकाल जो तो फोनमध्ये डोकं खुपसून बसलेला असतो. म्हणून विचार केला, आपणही फोनवरच बोलावं तुमच्याशी.”

वृंदा: “तुम्ही खरंच देव बोलताय? पण मग माझ्याशीच का?”

आवाज: “हं! आत्ता सुसंगत प्रश्न विचारलात. तुम्ही करता बराच माझा विचार... संवाद साधत नाही तुम्ही पण रागाने, अविश्वासाने का होईना वरचेवर तुमच्या मनात माझा विचार येतो.”

वृंदा: (अभिनिवेशाने) “माझा नाही विश्वास देवावर. आणि मला वाटतं आता हे आपलं नाटकी संभाषण पुरे झालं. तुमचं खरंच काही काम असेल माझ्याकडे तर...”

आवाज: “अं हं हं! हे तुम्ही राजेशचं वाक्य बोलतात. तुमचं स्वत:चं नाही ते. तुम्हाला असं वाटतं की आपण नास्तिक असावं. पण माझ्या नसण्यावरही तुमचा ठाम विश्वास नाहीये!”

वृंदा: “विश्वास ठेऊनही काय मिळतं?”

आवाज: “मन: शांती!”

वृंदा: (उपहासाने हसून) हं:! मला? आणि मन: शांती?"

आवाज: "तुमचा बराच ताबा आहे तुमच्या मनावर. कुढता तुम्ही; पण कोलमडून गेला नाहीत कधी."

वृंदा: "कोलमडून गेले असते तर बरं झालं असतं."

आवाज: "छे, छे! असं कसं? मनाच्या सामर्थ्यावर अजून बरंच काही साधायचं आहे तुम्हाला. जे या जन्मी नाही लाभलं ते पुढच्या जन्मी उपभोगायचंय."

वृंदा: "हे सगळं तुम्हाला कसं माहीत? सायकियाट्रिस्ट आहात का तुम्ही? राजेशने तुम्हाला बोलायला सांगितलं का माझ्याशी?"

आवाज: (हसून) "असं जर सायकियाट्रिस्ट स्वत:ला देव म्हणून फोन करायला लागला त्र त्यालाच वेडयाच्या ईस्पितळात दाखल करावं लागेल."

वृंदा: "मग कोण आहात तुम्ही?"

(वृंदाच्या मागे, व्हरांड्यात एक दिंडी उजवीकडून डावीकडे तालात पावले टाकत जाते. सर्वात पुढे भगवा झेंडा हातात धरलेला माणूस. त्याच्या मागे हातात टाळ घेतलेले, तुळशी वृंदावन घेतलेले पाच सहा स्त्री पुरुष, टाळ चिपळया वाजवत, तालात पावलं टाकत पण काहीही नं बोलता, जातात. टाळ आणि चिपळयांच्या तालावर पुढील वक्तव्य.)

आवाज: "विठ्ठल. 'रूप पाहता लोचनी, सुख झाले तो साजणी…' असं ज्ञानेश्वर म्हणाले ना, तोच! 'सुखाचे हे सुख, श्री हरी मुख…' असं नामदेवांनी सांगितलंना, तोच! 'आज मी ब्रह्म पाहिले…' असं अमृतराय म्हणतातना, तोच! 'जाता पंढरीसी, सुख वाटे जीवा, आनंदे केशवा भेटताची…' असं सेना म्हणतात ना, तोच!"

वृंदा: "मी काही या संतांच्या यादीत बसत नाही. मग मला कसा काय फोन केला?"

आवाज: "हं, आता मुद्द्याचं सांगतो. तर दूरान्वयाने का असेना, पण माझ्याशी संबंध येणाऱ्या असंख्य माणसांच्या मनातील कोलाहल एकसारखा ऐकता ऐकता, कधीतरी अचानक काहीतरी आकर्षक ऐकू येतं. तसा तो तुमचा आणि आनंदचा संवाद ऐकू आला. आनंद म्हणाला की या कमरेवर हात ठेवून उभ्या असलेल्या मूर्तीला बघायला हे लाखो लोक का येतात? तर त्यावर तुम्ही म्हणालात की ही मूर्ती म्हणजे त्या चिरंतन ईश्वराचं प्रतीक आहे. तर तो म्हणाला, हे कसलं प्रतीक? याहून सुंदर मूर्ती संग्रहालयात असतात. मग तुम्ही म्हणालात की विठ्ठल हा सर्वसामान्यांचा देव आहे. ज्या काळात महाराष्ट्रात विठ्ठलाच्या भक्तीचा संप्रदाय वाढला, त्या काळात प्रचलित असलेल्या वेशभूषेप्रमाणे, त्या वेळेच्या संस्कृतीला साजेल अशी मूर्ती तेंव्हा लोकांनी बनवली. मग प्राचीन पुराणांमध्ये वर्णन केलेल्या शस्त्रधारी देवांच्या मूर्तींपेक्षा सर्वसामान्य माणसासारख्या दिसणाऱ्या या विठ्ठल रुक्मिणींच्या मूर्ती करून लोकांनी देवळात प्रतिष्ठापित केल्या आणि त्यांच्या आधारे एका परम तत्वापर्यंत पोचण्याचा मार्ग उघडून दिला.... वगैरे वगैरे .... असं तात्त्विक स्पष्टीकरण तुम्ही आनंदला दिलं. त्यावर त्याचा प्रश्न होता की आताचा सर्वसामान्य माणूस कुठे असा दिसतो?

आणि तेंव्हा हे संभाषण तिथेच संपलं. पण नंतर दिल्लीला आल्यावर तुमच्या मनात एक विचारचक्र सुरु झालं. खरंच, काळानुसार ईश्वराच्या प्रतिमांमध्ये बदल होत गेला. मौर्य काळातील विष्णूच्या प्रतिमेपेक्षा गुप्त काळातील प्रतिमेची जडणघडण, वेशभूषा, अलंकार, उभे राहण्याची पद्धत वेगळी आहे. त्यानंतरच्या चौल, गांधार, चंदेला या काळांतील मूर्ती वेगळ्या आहेत. अकराव्या किंवा बाराव्या शतकातील विठ्ठलाची मूर्ती वेगळी आहे... मग एकविसाव्या शतकातील विठ्ठलाची मूर्ती आधुनिक नको का?

आणि याच विषयावर बोलण्यासाठी मी तुम्हाला फोन केला."

वृंदा: (आश्चर्याने दिन्मूढ होऊन) "हे सगळं खरं आहे, पण हे तुम्हाला कसं कळलं? मी हे सगळं आनंदपाशी ही नाही बोलले, राजेशकडे तर नाहीच. लिहून किंवा रेकॉर्ड करूनही नाही ठेवलं. मग कसं कळलं?"

आवाज: "कसं म्हणजे? अहो तुमच्यात आणि माझ्यात काही फरक आहे का?"

वृंदा: "हं, आजकाल मेंदूतल्या लहरीवरून माणूस काय विचार करतो आहे ते कळतं म्हणे. तू माझ्या मेंदूतल्या लहरी tap करतो आहेस का?"

आवाज: "अहो वृंदा मॅडम, त्याच्यासाठी EEG चे electrodes लावावे लागतात डोक्यावर. Electroencephalogram काढावा लागतो मेंदूचा. असं लांबून रिमोट कंट्रोल ने नाही करता येत ते."

वृंदा: "मग कसं कळलं तुम्हाला? आजकाल सोशल मिडियाच्या profile वरून सुद्धा बरंच काही कळतं म्हणे. Artificial intelligence ला."

आवाज: "तुम्ही केलेत का पोस्ट हे विचार कुठल्या सोशल मिडिया च्या platform वर?"

वृंदा: "नाही. मग? मग कसं कळलं तुला? तुम्हाला?"

आवाज: "तुमचे विचार मी ऐकले! बस्स! बरं ते जाऊदे. पण समजा आज तुम्हाला एखाद्या नवीन देवळातली मूर्ती तयार करायला सांगितली, तर कशी कराल तुम्ही?"

वृंदा: (हसून) "मी काय शिल्पकार आहे का? पण मला असं वाटतं की आजकालच्या तरुण पिढीला पटेल, त्यांचं मन ज्या रूपाशी समन्वय साधू शकेल अशी मूर्ती असावी."

आवाज: "म्हणजे जीन्स आणि टी शर्ट घातलेली?"

वृंदा: "काय हरकत आहे?"

आवाज: "जीन्स, टी शर्ट, हातात मोबाईल, डोळयांवर काळा चश्मा... देव न वाटता सिनेमातला हिरो वाटेल तो!"

वृंदा: "पूर्वीच्या मूर्तीही त्या काळच्या हिरोंवर – म्हणजे राजांवर बेतल्या होत्या ना. मग आताही..."

आवाज: "कल्पना करा... तुम्ही एखाद्या देवळात जाता... दारावरच्या गणपतीला नमस्कार करता, घंटा वाजवता, पायरी जवळचं कासव ओलांडून पुढे जाता आणि गाभाऱ्यात काय, तर जीन्स प्यांट घातलेला देव!"

वृंदा: "मग नुसती देवाची मूर्ती आधुनिक करून चालणार नाही, देऊळही आधुनिक करायला हवं."

आवाज: "म्हणजे कसं? Magnetic प्रवेशद्वार, आत डिस्को लाईट्स, virtual reality वापरून तयार केलेले देखावे, आणि LED laser shows? देऊळ नाही थीम पार्क होईल ते!"

वृंदा: "पण लोकांना आवडेल ते. करमणूक ही होईल."

आवाज: "तुम्हाला आवडेल?"

वृंदा: "मुळीच नाही. पण मग आनंद सारख्या मुलांना देवळात गेल्यावर परमेश्वराची अनुभूती कशी येणार? मुळात देवळात जायलाच उत्सुक नसते ही पिढी. आमचं जग वेगळं होतं. लहानपणी मोबाईल, कॉम्प्युटर, सोशल मिडिया असलं काही नव्हतं. टीव्ही सुद्धा नव्हता. तेंव्हा आजीबरोबर देवळात जाणं हा एकच विरंगुळा असायचा. इतर

वेळी घर आणि शाळा. मग सुटीच्या दिवशी घरापासून चालत देवळापर्यंत जायचं. तिथे फारशी गर्दी नसायचीच. देवळाच्या प्रांगणात आजीला इतर बायका भेटायच्या. विचारपूस व्हायची. मग देवळाच्या दगडी पायऱ्या चढून जायचं. घंटा वाजवायची. त्या आवाजावरून देवीला आपण आलेलो कळलं, हे समजायचं. मग साक्षीच्या गणपतीला पहिला नमस्कार करायचा. मग उंबरा ओलांडून दगडी सभामंडपात प्रवेश. समोर गाभाऱ्यात साक्षात देवी. तिचे रोखून बघणारे चांदीचे डोळे. ती नजर आपल्या आरपार जातेय असं वाटायचं. हात जोडून डोळे मिटले तरी ती नजर जाणवायची, त्या गाभाऱ्यातील गारवा, हळदी-कुंकवाचा, धूप-उदबत्तीचा सुवास, रक्षा कुंडातील राखेत उमटलेले बोटांचे ठसे, फुलांचा घमघमाट हे सगळं एकदम जाणवायचं. मग प्रदक्षिणा. देवीच्या मागच्या भिंतीवर डोकं टेकलं की आई कामात असताना भीती वाटली की जसं आईच्या पाठीला जाऊन चिकटायचो तसं काहीसं वाटायचं. मग आजीचा हात धरून सावकाश चालत, प्रसादाचे फुटाणे खात घरी यायचं.

अशा अनुभवातून देव भिनायचा मनाच्या रोमारोमात. आजकाल कुठे असं होतं? देवळाच्या रस्त्यावर वाहनांचा गोंगाट असतो. देवळाच्या आत प्रचंड गर्दी असते. दर्शनासाठी तासन तास रांगेत उभं राहायला लागतं. गाभाऱ्यातील देवाशी संवाद साधण्याची संधीच मिळत नाही.”

आवाज: “पण मग देवळाचं थीम पार्क केलं तर गर्दी आणखी वाढेल. लोक देवासाठी नाही तर करमणुकीसाठी येतील.”

वृंदा: “आता देखील त्यासाठीच येतात. किंवा काहितरी मागायला. पण आधुनिक देवळात इतरही येतील. आणि मग त्यांना ओळखीच्या वाटणाऱ्या माध्यमातून अनुभवतील देव.”

आवाज: “बाप रे! म्हणजे माझा पूर्ण कायापालट करून टाकायचा विचार दिसतोय तुमचा.”

वृंदा: “हो! आधुनिक पोशाखातील देव, हातात शस्त्रान ऐवजी मोबाईल, laptop... पूजेऐवजी सोशल मिडिया पोस्ट...”

आवाज: “असा देव तुम्हाला तरी ओळखता येईल का?

(राजेश फिरून परत येतो. बूट काढून ठेवतो.)

सर आले वाटतं फिरून. (मिस्कील पणे) आज जास्त लांब गेलेच नाहीत. चला, आज एवढं बोलणं बास झालं. पुन्हा बोलूच या विषयावर.”

वृंदा: “अहो, थांबा. हे सगळं... हलो, हलो...”

राजेश: “आज सकाळी सकाळी कोणाशी बोलणं चाललंय?”

(सोफ्यावर येऊन बसतो. वर्तमानपत्र उघडतो.)

वृंदा: “देवाशी.”

राजेश: “ठीक आहे. नको सांगूस.”

(वृंदा विचारमग्न. दाराची बेल वाजते. राजेश जाऊन दार उघडतो आणि पुन्हा सोफ्यावर येऊन बसतो. शांता आत येते आणि दिवाणखान्यातून आत स्वयंपाकघरात जाते.)

राजेश: “शांताबाई, चहा येऊ दे.

(वृंदाला उद्देशून) पाहुणे मंडळी अजून उठली नाहीत वाटतं.”

वृंदा: “अं? हो.” (अजूनही विचारात गढलेली.)

राजेश: (वर्तमानपत्रातील काही बातम्या मोठ्याने पण स्वगत वाचतो.)

(शांताबाई दोन कप चहा आणून ठेवते.)

राजेश: “आपल्याला बँकेत जायचं आहे ना आज? लवकर जाऊया. उशीर झाला की गर्दी वाढते.”

वृंदा: “हो. मी शांताला नाश्त्याचं सांगून येते.” (स्वयंपाकघरात निघून जाते.)

(बैठकीच्या मागील बाजूस असलेल्या जिन्याने सोनाली खाली येते.)

सोनाली: “गुड मॉर्निंग अंकल.”

राजेश: (भरघोसपणे) “गुड मॉर्निंग. गुड मॉर्निंग. काय झोप नीट लागली का नाही? थोडं आधी उठली असतीस तर माझ्याबरोबर मॉर्निंग वॉकला येऊ शकली असतीस.”

सोनाली: “अरे वा! चहा तयार. माझ्यासाठी आहे का?”

राजेश: “हो, हो! घे ना!”

(सोनाली आणि राजेश चहा पीत बसतात. वृंदा प्रवेश करते.)

सोनाली: “गुड मॉर्निंग मावशी.”

वृंदा: “गुड मॉर्निंग. झाली का झोप?

(तिचा चहा सोनालीने घेतला आहे हे पाहते.)

शांता, एक कप चहा आण अजून.”

राजेश: )‘मी तयार होतो’ असे पुटपुटत आत जातो.)

वृंदा: (सोनालीला उद्देशून) “तुला खरेदी करायला जायचंय ना आज? संध्याकाळी जाऊ.”

सोनाली: “मावशी, आई-बाबा संध्याकाळपर्यंत परत येणार आहेत. ते पोचायच्या आधी मला घरी परतायचं आहे. आपण थोडं लवकर जाऊया का?”

वृंदा: “हो, चालेल की. आत्ता आधी मी आणि राजेश बँकेत जातोय, नाश्ता करून. मी तासाभरात परत येईन. तोपर्यंत तू तयार हो. मग निघू.”

(शांता चहा आणून देते.)

वृंदा: “मी बघते नाश्त्याचं काम कुठवर आलंय.” (चहाचा कप उचलून स्वयंपाकघरात जाते.)

(जिन्यावरून आनंद येतो.)

सोनाली: “आनंद, तुझी मावशी एकदम झकास आहे. अगदी मनमिळाऊ.”

आनंद: “मग, मावशी कुणाची आहे!”

सोनाली: “चल, उगाच भाव खाऊ नकोस. शीक जरा त्यांच्याकडून.”

आनंद: “अग, आमचा ग्रेटनेस खानदानी आहे. माझ्या कुटुंबात एकेक जण कसे शेलके आहेत!”

सोनाली: “फारच मराठी यायला लागलंय की! Online course पूर्ण झाला वाटतं.”

आनंद: “Credit goes to मावशी.”

सोनाली: “मदत कर जा मग मावशीला जरा. मी जातेय तयार व्हायला.” (उठून जाऊ लागते.)

आनंद: “अग थांब ना. माझ्या डोक्यात एक कल्पना आली आहे.”

सोनाली: (पुन्हा बसत) “कोणती कल्पना?”

आनंद: “अग येत्या बुधवारी मावशीचा वाढदिवस आहे. पन्नासावा. आपण मावशीसाठी surprise birthday party देऊया का?”

सोनाली: “कल्पना चांगली आहे... पण मावशी आणि अंकल चा इतर काही प्लान असेल तर? त्यांना आधी विचारायला पाहिजे.”

आनंद: “विचारलं तर ती surprise party कशी होणार?

(चिडवून दाखवत) ‘मावशी, तुझा वाढदिवसाचा काही प्लान आहे का? आम्ही तुझ्यासाठी surprise party organise करणार आहोत!’”

सोनाली: “तसं नाही विचारायचं!”

आनंद: “शिवाय मावशी कधी आपला वाढदिवस साजरा करत नाही. वाढदिवसच काय, ती कोणतंच occasion साजरं करत नाही, असं आई म्हणते.”

सोनाली: “का?”

आनंद: “श्रुती गेल्यापासून. (उठून कोपऱ्यातल्या एका टेबलापाशी जातो. त्यावर ठेवलेला फोटो उचलून आणतो.) श्रुती! मावशीची एकुलती एक मुलगी. माझी मावस बहीण. तीन वर्षांची झाल्यावर कसलातरी ताप आला आणि अचानक वारली. मावशीला मुलं खूप आवडायची. आणि श्रुती म्हणजे तिचा जीव की प्राण होती, असं आई म्हणते. तेंव्हापासून मावशी खूपच बदलली म्हणे. आई आणि मावशी लहान असताना

कोणताही सणवार किंवा वाढदिवस असला की सगळ्या घरात मावशीचाच उत्साह ओसंडून जायचा असं आई सांगते. श्रुती गेल्यापासनं मावशी काहीच celebrate करत नाही.”

सोनाली: “किती वर्षं झाली या गोष्टीला?”

आनंद: “बावीस वर्षं. श्रुती आणि मी एकच वयाचे होतो. आमच्यात फक्त वीस दिवसाचं अंतर होतं. पहिली तीन वर्षं आई आणि मावशी सतत एकमेकींचा सल्ला घ्यायच्या, आमचे फोटो एकमेकीना पाठवायच्या... मोठं झाल्यावर आम्ही दोघे भाऊ बहीण अमेरिकेतल्या एखाद्या युनिव्हर्सिटीत एकत्र शिकू अशी स्वप्नं बघायच्या. श्रुती गेली आणि मावशीचं ते जग, तिची सारी स्वप्नं हरवून गेली...”

(काही सेकंद शांतता.)

सोनाली: “Done! आपण मावशीसाठी मस्त पार्टी करूया. माझ्या आईला एक चांगला catering करणारा माहीत आहे. त्याच्याकडे जेवणाची order देऊ. काय काय आवडतं मावशीला? मला वाटतं श्रीखंड पुरीचा बेत करू. नाहीतर बासुंदी पुरी. मसाले भात, मटकीची उसळ. केकची order देऊया आजच. काय लिहायचं केकवर? का फोटो केक करवून घेऊया?”

आनंद: “ते सगळं करूच गं. पण पार्टीला बोलवायचं कुणाला?”

सोनाली: “अर्थातच मावशीच्या मित्र मैत्रीणीना.”

आनंद: “इतकं सोपं नाही ते. आपल्याला कुठे माहीत आहेत मावशीचे मित्र मैत्रिणी कोण आहेत ते? आणि या वयात कुठे मोठा मित्रपरिवार असतो? शिवाय तिला ज्यांना भेटायला आवडेल अशाच लोकांना बोलावलं पाहिजे.”

सोनाली: “मावशीचे ऑफिसमधले सहकारी असतील की. आणि शेजारी पाजारी. इतर कोणी नातेवाईक आहेत का दिल्लीत? माझे आई-बाबा येतील. नाहीतरी मावशी म्हणतच होत्या त्यांना एकदा बोलवायला हवं म्हणून.”

आनंद: “आपल्याला राजेश अंकलना सांगायला लागेल. त्यांच्या मदतीशिवाय शक्य नाही होणार.”

सोनाली: “त्यांना मी पटवते. हे बघ, आज संध्याकाळी मी घरी गेले की आई-बाबांना सांगून catering ची सगळी व्यवस्था करेन, केकची order ही देईन. उद्या तू घरीच आहेस तेंव्हा तू निमंत्रणं पाठवण्याचं बघ. मी आज राजेश अंकलना विचारून एक यादी करून तुला पाठवून देते. बुधवारी तू जरा लवकर ये घरी... चार वाजेपर्यंत. मी साडेचार पर्यंत पोचेन इथे. मग आपण थोडी सजावट वगैरे करू. मावशी आणि राजेश अंकल सहा-साडेसहा पर्यंत ऑफिसातून येतात. आपण तीच वेळ देऊ पाहुण्यांना. म्हणजे मावशीला आल्या आल्या surprise!”

आनंद: “छान प्लान आहे.”

सोनाली: “चल, जाते मी आता तयार व्हायला.” (जिन्याने वर जाते. राजेश प्रवेश करतो. आंघोळ करून बाहेर जाण्याचे कपडे करून आला आहे.)

आनंद: “गुड मॉर्निंग अंकल. आज सुटी दिवशी कुठे निघालात?”

राजेश: “बँकेत जायचंय. सुटी असली तरी तुझी मावशी कुठे घरी बसू देते! तुमचं बरं आहे... ऑफिसमध्ये बसून कंटाळवाण काम नाही करावं लागत. काम म्हणजे काय, तर सिनेमाचं शूटिंग!”

आनंद: (हसून) “इतकं सोपं नसतं ते अंकल. बरंच वणवण फिरावं लागतं. आणि मी feature films नाही तयार करत. Documentary च्या विषयाच्या मुळाशी जावं लागतं.”

राजेश: “हो, पण documentary चा विषयही तूच ठरवतोस ना!”

आनंद: “ते खरं आहे. पण त्यासाठी कुठे कुठे हिंडून शूटिंग करावं लागेल हे नंतरच ठरतं. आता माझी सध्याचीच documentary बघा ना. वारकरी पंथाविषयी अमेरिकेत कुणाला माहिती नाही म्हणून मी हा विषय निवडला. त्यावर मी आणि आमच्या विषय तज्ञाने बरंच संशोधन केलं. माझ्या भारताच्या मागच्या ट्रिपमध्ये आम्ही आळंदी, देहू, पुणे असं शूटिंग केलं. या वर्षी आम्ही प्रत्यक्ष पंढरपूरला जाऊन आषाढी एकादशीला तिथल्या वातावरणाचं शूटिंग केलं, वारकऱ्यांच्या मुलाखती घेतल्या. दिंडीचं, पालखीचं शूटिंग केलं. documentary च्या मुख्य निवेदकाचं location शूटिंग ही करून झालं.”

राजेश: “मग झालं का पूर्ण आता काम?”

आनंद: “नाही अंकल. अजून बरंच काम आहे. Documentary च्या निवेदनाचं, voice-over चं रेकॉर्डिंग व्हायचं आहे. पार्श्वसंगीत घालायचं आहे. काही भारतीय संशोधकांच्या आणि वारकऱ्यांच्या मुलाखती मराठीत आहेत. त्यांचं भाषांतर करून sub-titles बनवायची आहेत... पण शूटिंग चा भाग मात्र संपला आहे. मी दाखवतो सगळं footage तुम्हाला आणि मावशीला जाण्यापूर्वी.”

राजेश: “मावशीला दाखव तुझ्या. मला काही त्यात रस नाही.”

आनंद: “का बरं?”

राजेश: “हे देव, देवळ, सण वार हे सगळं म्हणजे वेळेचा अपव्यय आहे. आयुष्यातील कटू सत्याला सामोरं जाण्यास जेंव्हा माणूस घाबरतो तेंव्हा मनाला भूल पाडण्यासाठी आत्मसात केलेलं मायाजाळ आहे हे सगळं.”

आनंद: “पण अंकल, देवावर विश्वास ठेवणारे सगळेच काही आपल्या आयुष्यात कटुता अनुभवत असतात असे नाही. या documentary च्या निमित्ताने मी अनेक सामान्य माणसांना भेटलो. त्यातले बरेच जण सुखी समाधानी जीवन जगणारे आहेत. पण त्यांची देवावर श्रद्धा आहे.”

राजेश: “असे लोक लोभी असतात. ऐहिक सुखाच्या प्राप्तीसाठी ते देव ही संकल्पना मानतात. स्वतःच्या क्षमतेवर जे मिळवणं शक्य नाही किंवा ज्या गोष्टी त्यांच्या प्रभावाच्या क्षेत्राबाहेर आहेत त्या कोणीतरी एक सर्वशक्तिमान व्यक्ति त्यांना बहाल करेल अशी त्यांना आशा असते. मग अशा व्यक्तीला लाच देण्यासाठी भक्ती, वारी, पूजा आणि इतर सोपस्कार करतात.”

आनंद: “बरोबर आहे अंकल. देवाला नवस सायास करणारे, भटजींच्या सांगण्यावरून कर्मकांड करणारे, भोंदू गुरूंच्या आणि स्वामींच्या आहारी जाणारे लोक ही असतात. पण तो एक वेगळा गट आहे. मला भेटलेले वारकरी साधे सरळ तत्वज्ञान मानतात. पंढरपूरच्या विठ्ठलावर त्यांची नितांत श्रद्धा आहे. नित्य त्याचं स्मरण करावं आणि वर्षातून एकदा त्याचं दर्शन घ्यावं एवढाच त्यांचा भोळा भाव आहे. ते लोक संकटांनी गांगारूनही गेलेले नाहीत किंवा ऐहिक सुखासाठी गाऱ्हाणं ही घालत नाहीत.”

राजेश: “नाहीत कसे? त्यांच्या आयुष्याचा परीघच फार लहान असतो आणि म्हणून त्यांची सुख दुःख ही लहानच असतात. दुष्काळ, साथीचे आजार, अकाली मृत्यू, कर्ज अशा संकटांपासून देव वाचवेल अशी त्यांना आशा

असते. भरपूर पीक पाणी, दूध दुभतं, मुलं बाळ मिळावीत अशी त्यांची अपेक्षा असते. आणि अशी इच्छा बाळगणं यात काहीच गैर नाही. पण जीवनाचा स्तर वाढवण्यासाठी आवश्यक ते विज्ञान आणि तंत्रज्ञान विकसित करून व्यापार उदीम वाढवण्या ऐवजी हे लोक एका काल्पनिक आणि fatalistic प्रवृत्ती वाढवणाऱ्या देव या संकल्पनेचा आधार घेतात."

आनंद: "पण अमेरिकेत या उलट स्थिती आहे अंकल. उच्च शिक्षण घेतलेले, यशस्वी career असलेले, सर्व सुख सोयींनी युक्त जीवनमान भोगणारे लोक देखील अध्यात्माकडे वळताहेत. जगभरचे प्राचीन धर्म अभ्यासताहेत. पौर्वात्य जीवन पद्धतीचा अवलंब करताहेत. म्हणून तर मी ही documentary तयार करतो आहे. भारतातील भक्ती संप्रदाय, ईश्वराशी वैयक्तिक स्तरावर नातं जोपासण्याची परंपरा, परमेश्वराच्या स्थूल मूर्तीच्या दर्शनाची आस या सर्वांबद्दल अमेरिकेतली लोकांना कुतूहल आहे."

राजेश: "कोणत्याही समाजात अशा प्रकारच्या साम्मोहनाला बळी पडणारे लोक असणारच."

आनंद: "पण त्यामुळे जर त्यांच्या मनाला शांती मिळत असेल, एका वेगळ्या स्तरावरची अनुभूती होत असेल, मनाच्या संवेदन क्षमतेच्या एका नवीन पैलूची ओळख होत असेल तर ती वाटही आजमावून पहायला हवी."

राजेश: "तुला झाली आहे अशी काही अनुभूती?"

आनंद: "मला नाही पण मावशीचा आहे विश्वास देवावर."

राजेश: “सारासार विचार करण्याची क्षमता सर्वांकडे असतेच असं नाही. What you need is rational thinking.

आमच्या आयुष्यात जी वाईट घटना घडली त्याचा परिणाम वृंदाच्या विचार शक्तीवरही झाला आहे.”

आनंद: “त्या आधी होता का मावशीचा देवावर विश्वास?”

राजेश: “असेलही!”

वृंदा: (आतूनच) “नाश्ता तयार आहे. या आत. गरम गरम खाऊन घ्या.”

राजेश: “आलोच.” (आत जातो.)

(आनंद teepoy वरचा laptop उचलून काम करू लागतो. वृंदा प्रवेश करते.)

वृंदा: “अरे आनंद, चल ना नाश्ता करायला. पोहे गार होतील.”

आनंद: “तू आणि अंकल सुरुवात करा ना मावशी. सोनाली तयार होऊन येते आहे. मी थांबतो तिच्यासाठी. By the way मावशी, माझं शूटिंग, एडिटिंग चं काम संपलं आहे. तेंव्हा पुढचा आठवडाभर मी घरीच आहे. तुझं काही काम असलं तर सांग. नाहीतर तू पण सुटी घे.”

वृंदा: “नाही रे! या आठवड्यात काम आहे ऑफिसमध्ये. त्याच्या पुढच्या आठवड्यात तुम्ही जाणार तेंव्हा घेईन सुटी. आणि घरी बसून वेळ जात नाही रे माझा. खूप उदास वाटतं.”

आनंद: “मावशी... इतकी वर्षं झाली. आता तरी तू स्वतःला माफ करायला हवस. थोडं life enjoy कर...”

वृंदा: “माझ्या enjoyment च्या व्याख्या बदलल्या आहेत आता आनंद. In fact, enjoyment चा threshold बराच वर गेलाय. त्यामुळे काय केल्यावर आनंद होईल किंवा समाधान मिळेल हे सांगणं कठीण आहे.”

आनंद: “तू फार भावना विवश होतेस मावशी.”

वृंदा: “हो. बरोबर. तसं होता कामा नये. ‘भावना देखील संदेश वहनाचं काम करतात...’ अरे आनंद, अरे एक चमत्कार झालाय.”

आनंद: “चमत्कार? कसला चमत्कार?”

वृंदा: “अरे मला देवाचा फोन आला होता.”

आनंद: “म्हणजे?”

वृंदा: “देव! विठ्ठल! पंढरपूरचा देव विठ्ठल.”

आनंद: “मावशी, काय म्हणायचंय काय तुला?”

वृंदा: “अरे माझा पण विश्वास बसत नाहीये. पण मी तुला म्हटलं होतं ना की विठ्ठल नावाच्या कुणाचा तरी मला एक-दोनदा फोन आला होता म्हणून? आत्ता सकाळी परत आला होता.”

आनंद: “बरं मग? कोणी prankster आहे का?”

वृंदा: “काय कोण जाणे. त्याला माझ्या मनातले सगळे विचार माहीत होते. (खुशीत) खूप छान गप्पा मारल्या आम्ही.”

आनंद: “गप्पा मारल्या? कशावर?”

वृंदा: “हेच... देव... देवाची मूर्ती... बदलत्या काळानुरूप देवाची प्रतिमा देखील कशी बदलायला पाहिजे वगैरे...”

आनंद: “काय पण मावशी! तुला कोणीपण सहज गंडवून जाईल. बघू तुझा फोन. कुठल्या नंबर वरून आला होता कॉल?”

(वृंदा फोन आनंदकडे देते.)

“हा सहा पंचावन्न ला आलेला फोन?”

वृंदा: “हो.”

आनंद: “दहा मिनिटं झाला हा कॉल. दहा मिनिटं बोललात तुम्ही.”

वृंदा: “हो, असेल.”

आनंद: “काय नाव सांगितलं त्याने?”

वृंदा: “विठ्ठल.”

आनंद: “मी call back करतो...”

)“This number does not exist. Please check the code” असा recorded message ऐकू येतो.)

“थांब. मी नेटवर बघतो हा कुठला नंबर आहे ते.”

(laptop वर चेक करतो.)

“हो, बरोबर. कोड पंढरपूरचाच आहे पण हा नंबर अस्तित्वात नाही असं लिहिलंय.”

वृंदा: “आनंद, आनंद, अरे लक्षात येतंय तुझ्या? तो खरंच देवाचा फोन होता. देव बोलला माझ्याशी. एकदा नव्हे, चक्क तीनदा. आणि... आणि मी विश्वासच ठेवला नाही... मला बोलायचंय त्याच्याशी आणखी... खूप

खूप बोलायचंय. माझी श्रुती कुठे आहे ते विचारायचंय त्याला... देव बोलला... साक्षात. मलाही तिकडे घेऊन जा म्हणून सांगेन मी त्याला... श्रुती जिथे असेल तिथे... बघू दे दे... माझा फोन दे... परत फोन येईल त्याचा... देव बोलला माझ्याशी..."

(आनंदाने, आश्चर्याने भारून गेली आहे. आनंद आश्चर्याने तिच्याकडे बघतच राहतो. पडदा पडतो.)

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

पडदा वर जातो तेंव्हा वृंदाच्या दिवाणखान्यात आनंद एकटा सोफ्यावर बसून laptop वर काम करतो आहे. बेल वाजते आणि पाठोपाठ वृंदा स्वतःच्या किल्लीने दरवाजा उघडून आत येते.

आनंद: “हाय मावशी! आज उशीर झाला.”

वृंदा: (हाशहुश करत त्याच्या शेजारी येऊन बसते.) “Traffic... कसला जाम झाला होता रस्त्यावर. दीड तास झाला मला ऑफिस मधून निघाले त्याला.”

आनंद: “अरे बाप रे! दीड तासात दीडशे मैल जाता येतं अमेरिकेत.”

वृंदा: “हो ना! आणि माझं ऑफिस फक्त पंधरा किलोमीटर वर आहे.”

आनंद: “बस थोडा वेळ. कोकमचं सरबत आणू करून?”

(स्वयंपाकघरात जातो).

वृंदा: “कसलं दमायला होतं अशा गर्दीतून गाडी चालवून. आणि पुन्हा वेळेचा अपव्यय!”

(फोन वाजतो).

वृंदा: (किंचित त्रासिक आवाजात) “हलो!”

आवाज: “हाय! ते गाडीचं क्लच प्याड जरा झिजलं आहे. उद्या taxi ने च जा ऑफिसला आणि वीकेंडला तेवढं बदलून घ्या. ऐनवेळी तुटलं आणि गाडी वेगात असेल तर अपघात होऊ शकतो.”

वृंदा: “हलो, कोण बोलतंय?”

आवाज: “विठ्ठल बोलतोय. मघाशीच करणार होतो फोन पण म्हटलं गाडी चालवताना तुम्ही उचलणार नाही फोन.”

वृंदा (चिडून): “ही काय चेष्टा आहे! नुसता वैताग झाला आहे. सारखा सारखा काय रे करतोस फोन? हिम्मत असेल तर समोर ये!”

आवाज: “आणि हो! तो धौलकुआचा traffic सिग्नल चुकवता आला तर कमी वेळ गर्दीत अडकावं लागेल. Cant मधून कट मारून सरळ शास्त्री बाजार वरून यायचं.”

(आनंद सरबत घेऊन येतो.)

वृंदा: “हलो! माझ्यावर पूर्ण पाळत ठेऊन आहे हा... हलो! हलो!”

(फोन कट होतो).

“आनंद , पुन्हा आला होता त्याचा फोन! मला वाटतं stalking करतोय कुणीतरी माझं. पाळत ठेऊन आहे तो माझ्यावर.”

आनंद: “काय म्हणत होतं आता? बघू नंबर.”

(वृंदा फोन आनंदकडे देते.)

वृंदा: “माझ्या गाडीचं क्लच pad झिजालंय. बदलून घे म्हणाला. आणि मी कुठल्या रस्त्याने घरी आले हे पण माहीत आहे त्याला.”

आनंद: “कोड पंढरपूरचाच आहे पण हा नंबर वेगळा आहे.”

(नंबर dial करतो. फोन engage असल्याचा आवाज येतो.)

वृंदा: “मला भीती वाटतेय आनंद! कोण असेल तो?”

आनंद: “Relax मावशी. अग नुसता nuisance caller असेल एखादा.”

वृंदा: “पण मग त्याला कसं कळलं मी traffic जाम मध्ये अडकले होते म्हणून? आणि मी धौलाकुआ वरून येते हे? पाठलाग करत असेल का तो माझा?”

आनंद: “एवढ्या गर्दीत कसा पाठलाग करता येईल?”

वृंदा: “कोणीतरी त्याला माझ्यावर पाळत ठेवायला सांगितले असेल. माझ्या नावाची सुपारी दिली असेल तर?”

आनंद: “काहीतरीच काय मावशी! तुझं आहे का कोणाशी वैर?”

(वृंदा मानेनेच नाही म्हणते.)

आनंद: (मिस्कीलपणे) “तुझा admirer असेल एखादा.”

वृंदा: “इतक्या वर्षात कोणी भेटला नाही ते! आता पन्नाशी उलटल्यावर कसला admirer भेटणार!”

(बेल वाजते. आनंद दार उघडतो. राजेश प्रवेश करतो.)

आनंद: “हाय अंकल!”

(राजेश हातातली bag ठेऊन सोफ्यावर येऊन बसतो. सरबत उचलून पिऊ लागतो. वृंदा आपल्याच विचारात गढलेली आहे. सचिंत.)

राजेश: “तू पण आत्ताच आलीस वाटतं.”

वृंदा: “हो! भयंकर traffic जाम होता. दीड तास लागला पोचायला.”

राजेश: “हो, मलाही traffic लागलाच.”

वृंदा: (अचानक काहितरी सुचल्यासारखे) “राजेश, माझ्या गाडीचं क्लच pad झिजलं आहे. तू वीकेंडला गाडी घेऊन जाशील का workshop मध्ये?”

राजेश: “क्लच pad झिजलं आहे? कशावरून? काही प्रॉब्लेम येतोय का चालवताना?”

वृंदा: “अं? नाही. म्हणजे हो. तू गाडी workshop मध्ये नेऊन जरा चेक करून आण ना प्लीज.”

राजेश: “बघू.”

वृंदा: “बघू नाही. नक्की जा. उद्या मी taxi ने ऑफिसला जाईन.”

राजेश: “अग पण प्रॉब्लेम काय आहे? तुला कुणी सांगितलं की क्लच pad झिजलंय म्हणून?”

वृंदा: “विठ्ठलाने.”

राजेश: “कोण विठ्ठल?”

वृंदा: “तो, फोन करतो तो.”

राजेश: “फोन करतो? कोण?”

वृंदा: “माहीत नाही. गेल्या काही दिवसात तीन-चारदा त्याचा फोन आलाय. तो म्हणतो की तो विठ्ठल बोलतो आहे. पंढरपूरचा देव विठ्ठल. त्याला माझ्याबद्दल सगळं माहीत आहे. माझे विचार सुद्धा!”

राजेश: “काय? कोणीतरी गंडवतय तुला आणि तू वेड्यासारखी बोलतेयस त्याच्याशी? उद्या तुझा क्रेडिट कार्डचा नंबर, पिन सगळं विचारेल.”

वृंदा: “तसलं काही बोलत नाही तो.”

राजेश: “मग काय बोलतो?”

वृंदा: (हसून) “आम्ही देव या विषयावर बोलतो.”

राजेश: (नाटकीपणाने हात जोडून) “छान! जगात काय बुवेबाजी करणारे थोडे आहेत! हा तर स्वतःला देव म्हणवून घेतोय.”

वृंदा: “अरे पण मी तेच तर म्हणतेय. तू प्लीज गाडी चेक करून आण ना. म्हणजे जर क्लच झिजलेला नसेल तर सिद्धच होईल की तो कोणीतरी थापेबाज आहे म्हणून.”

राजेश: “असल्या फालतू कामात घालवायला वेळ नाही मला. पुन्हा फोन आला तर बोलु नकोस त्याच्याशी.”

(उठून निघून जातो.)

वृंदा: “अरे पण राजेश....”

आनंद: “Relax मावशी. मी जाईन तुझी गाडी घेऊन workshop मध्ये. चेक करून आणेन.”

वृंदा: “जाशील खरंच? Thank you. (Relaxed मूड मध्ये) आज काय केलंस दिवसभर?”

आनंद: “काही नाही. घरीच होतो. Documentary चं स्क्रिप्ट revise करत होतो. मला थोडी अभंगांची अवतरणं हवी आहेत. येत्या शनिवार-रविवारी

बसू या का आपण थोडा वेळ? तुला एडीट केलेलं सगळं footage ही दाखवायचंय."

वृंदा: "हो! नक्की बसू. सोनालीलाही बोलाव. आई बाबा आले का तिचे?"

आनंद: "हो, आले ना. ती बिझी आहे सध्या घरात."

वृंदा: "चला, आठ वाजायला आले. शांता आली आहे का?"

(स्वयंपाकघरात जाते. आनंद पुन्हा laptop घेऊन बसतो. आतून शांता येते. झपझप बाहेर जाऊ लागते.)

शांता: "दार लावून घ्या दादा."

आनंद: "शांताबाई! एक मिनिट."

(कानोसा घेऊन) तुम्हाला काही सांगायचं आहे. पुढच्या आठवड्यात बुधवारी मावशीचा वाढदिवस आहे. पन्नासावा. मी आणि सोनाली तिच्यासाठी surpise party द्यायचं ठरवतो आहोत."

शांता: "कसली पार्टी?"

आनंद: "शू...! मावशीला माहीत नाहीए. तिच्या नकळत पार्टीची तयारी करायचीय आपल्याला. मी आज २०-२५ लोकांना निमंत्रण दिलंय."

शांता: "इतके लोक येणार?"

आनंद: "घरी काही स्वैंपाक नाही करायचा. सोनाली सगळं बाहेरून मागवणार आहे. आम्हाला फक्त तुमची थोडी मदत लागेल. त्या दिवशी थोडं लवकर याल का?"

शांता: “हो! तुमच्या मावशी फार चांगल्या आहेत बघा. माझ्या मुलांच्या वाढदिवसाला आवर्जून केकसाठी पैसे देतात. पण त्यांनी स्वतःचा वाढदिवस साजरा केलेला मी कधी बघितलं नाही.”

आनंद: “हो ना! आता या वर्षी मी इथे आहे ना, म्हणून साजरा करायचा. शिवाय पन्नासावा आहे ना!”

शांता: “सरांना माहिती आहे का?”

आनंद: “हो. सोनालीने सांगितलं आहे त्यांना. त्यांच्याकडूनच मावशीच्या मित्र मैत्रिणींचे फोन नंबर घेतले ना!”

शांता: “हां! तुमची बायको पण ब्येस्त आहे बघा दादा.”

आनंद: “बायको नाही आहे ती माझी...”

शांता: “अजून नाही... पण होणारे ना! आता भारतात आलाय तर करून टाका की लगीन. तुमच्या मावशीला पण जरा मिरवायला मिळेल.”

आनंद: “हो. आधी वाढदिवसाची पार्टी तर करू. तुम्ही पार्टीबद्दल काही बोलु नका हं मावशीसमोर.”

शांता: “नाही नाही. तुम्ही करा तयारी. मी येईन मदत करायला. सप्राइज का काय ते पार्टीसाठी.”

(बाहेर निघून जाते. आनंदचा फोन वाजतो.)

आनंद: “हाय सोना!”

सोनालीचा आवाज: “आल्या का मावशी?”

आनंद: “हो. आताच आली थोड्या वेळापूर्वी.”

सोनालीचा आवाज: “खोलीत आहे का कोणी, का आपण बोलू शकतो?”

आनंद: “नाही, इथे कोणी नाही आहे. बोल तू.”

सोनालीचा आवाज: “निमंत्रणांच काय झालं? सगळयांना बोलावून झालं का?”

आनंद: “हो. सगळयांना फोन केले आणि Whatsapp messages ही पाठवले. सतरा जणांनी accept ही केलं आहे. सात-आठ जण रविवार पर्यंत सांगतो म्हणालेत. तू केटरिंग चं सांगितलं का?”

सोनालीचा आवाज: “सगळी order दिली आहे. जेवणाची आणि केकची पण.”

आनंद: “छान.”

(आतून वृंदाचा आवाज येतो.)

वृंदा: “आनंद, ये जेवायला. वाढतेय मी.”

आनंद: “आई-बाबांना सांगितलंस?”

वृंदा: “हो. ते तयार आहेत यायला.”

आनंद: “ठीक आहे. चल, फोन ठेवतो मी. मावशी जेवायला बोलावते आहे.”

(आत जातो. रंगमंचावर अंधार.)

# प्रवेश २.

वृंदाचा दिवाणखाना. वेळ संध्याकाळची. सोफ्यावर वाळलेल्या कपड्यांचा ढीग. वृंदा उभ्याउभ्या कपड्यांच्या घड्या करते आहे. फोन वाजतो.

वृंदा: “हलो.”

आवाज: “हाय वृंदा!”

वृंदा: “कोण?”

आवाज: “विठू”

वृंदा: “हा काय चावटपणा आहे?”

आवाज: “चावटपणा कसला त्यात? आजकाल तुम्ही सगळे असंच बोलता फोनवर. मी माझी image contemporary करायचा प्रयत्न करतो आहे.”

वृंदा: “हे पहा, मला उगीचच्या उगीच फोन करत जाऊ नका, प्लीज! मला नाही बोलायचं तुमच्याशी.”

आवाज: “ठीक आहे. तुम्ही नका बोलू. मी बोलतो. तुम्ही ऐका. ज्या क्षणी माझ्या बोलण्याचा कंटाळा येईल, त्या क्षणी फोन बंद करा.”

वृंदा: “तुम्हाला काय काम बीम नाही?”

आवाज: “म्हटलं तर आहे, म्हटलं तर नाही. पूर्वी फार काम असायचं. लोक सारखी माझी आठवण काढायचे, बोलवायचे. माझ्या चिंतनात गुंग होऊन भजन कीर्तन करायचे. तिथे मी आनंदाने जायचो. कोणी भक्त आतुरतेने साद घालायचा. त्याची मदत करायला धावायचो. वयस्क माणस अखंड संवाद साधायची...”

वृंदा: “मग आता काय भजनं होत नाहीत? परवा समोरच्या ब्लॉक मध्ये भगवती जागरण चाललं होतं. रात्रभर आवाजाने झोप लागली नाही.”

आवाज: “हो, अगदी latest सिनेमाच्या गाण्यांच्या चाली वरची भजनं लावली होती. पण माझ्याशी कोणीच बोललं नाही.”

वृंदा: “तुझ्याशी बोलायचं म्हणजे कसं? भगवती जागरणाला गेल्यावर असं फोनवर बोलतोय तसं? ‘हाय देवी! मी आले’, असं म्हणत का कोणी?”

आवाज: “तसं म्हटलं तरी चालेल किंवा काहीच म्हटलं नाही तरी चालेल. पण जागरणाच्या निमित्ताने का होईना, स्वतःच्या मनात तरी डोकावून बघावं. मी तिथेच असतो. आजूबाजूच्या जगाचं भान विसरून, भूत आणि भविष्याचा विचार नं करता, काही क्षण मन आत्म शक्तीवर तरी केंद्रित करावं. किंवा समोरची मूर्ती ही त्या आत्मशक्तीचं प्रतीक आहे असं समजून त्या मूर्तीवर लक्ष केंद्रित करावं. बस! एवढं केलं तरी संवाद घडतो ना माझ्याशी.”

वृंदा: “तेवढं स्थैर्य असतं कुठे आजकालच्या जीवनात? आणि समजा कोणी तसं केलं तरी तो एकतर्फीच असतो ना प्रयत्न? देव कुठे बोलतो आपल्याशी?”

आवाज: “आत्ता बोलतोय ना! कितीदा फोन केला तुम्हाला. तुम्ही आपलं सारखं चिडता तरी किंवा घाबरून तरी जाता.”

वृंदा: “देव कधी असा काय फोन करतो काय?”

आवाज: “तुम्ही अशा देवाची स्वतःच्या मनात कल्पना केलीत म्हणून करतो. नुसती कल्पना नाही, खूप चिंतन केलंत या विषयी. इतरांशी, त्यांना हव्या त्या स्वरुपात साधतो मी संवाद.”

वृंदा: “पण ही आताची मुलं! आनंद काय, सोनाली काय! त्यांना कुठे तुझ्याबद्दल काही माहीत आहे? भारतीयच काय, पाश्चात्य तत्वज्ञान तरी कुठे वाचलेलं असतं त्यांनी? मग कशाला चिंतन वगैरे करतील ते?”

आवाज: “असंच काही नाही. आनंदला खूप कुतूहल आहे देव या संकल्पनेविषयी. स्वतःबद्दल, मनुष्याच्या अस्तित्वाबद्दल खूप विचार करतो तो.

Contemplation is the first step towards meditation.

सोनालीच्या घरात भक्तीमार्गाची भक्कम बैठक आहे. आयुष्यात पुढे मागे त्या मार्गाने ती माझ्या अधिक जवळ येण्याची शक्यता आहे.”

वृंदा: “आणि राजेश?”

आवाज: “हं! ... राजेशला केवळ पौराणिक देव संकल्पना माहीत आहे. पुराणात वर्णन केलेला देव अस्तित्वात नसतो हा त्याचा ठाम विश्वास आहे आणि त्यामुळे त्याच्यासाठी मी तसा नाहीच. आत्मा, परमात्मा हे शब्द त्याला केवळ व्याख्या म्हणून माहीत आहेत. त्यांची अनुभूती घेण्याची त्याची इच्छा नाही. आत्म्याच्या स्वरुपाची अनुभूती मनाच्या माध्यमातून होऊ शकते यावर त्याचा विश्वास नाही आणि म्हणून त्यासाठी तो कधी प्रयत्नही करणार नाही.”

वृंदा: “माझा देखील नेहमीच विश्वास असतो असं नाही. पण जर आत्म्याचं चिरंतन अस्तित्व खरं असेल तर माझी श्रुती कुठे आहे आत्ता?”

आवाज: “माझ्या ठिकाणी सुप्त स्वरुपात आहे.”

वृंदा: “मला कशी भेटेल?”

आवाज: “जशी तुझी इच्छा असेल तशी.”

वृंदा: “मला पुन्हा तिची आई व्हायचंय. तिला जवळ घ्यायचंय. लहानाचं मोठं करायचंय तिला. घास भारवायचाय तिला. न्हाऊ माखू घालायचंय. तिला...”

(बेल वाजते. वृंदा कशीबशी स्वतःला सावरते. दार उघडते. शांता आत येते.)

शांता: “काय झालं मॅडम? तुम्ही रडताय? अशा अंधारात एकट्याच कशाला बसलाय? बरं वाटत नाहीये का?”

(बटन दाबून दिवा लावते.)

वृंदा: “शांता... शांता... अग, मी देवाशी बोलत होते. साक्षात विठ्ठलाशी.”

शांता: “म्हंजे?”

वृंदा: “मला फोन येतो देवाचा. चार-पाच वेळा आलाय. पंढरपूरहून साक्षात विठ्ठल बोलतो माझ्याशी.”

शांता: “आसं कधी ऐकलं नाही मॅडम.”

वृंदा: “अग माझा पण आधी विश्वास बसत नव्हता. पण फार छान बोलतो गं तो. त्याच्याशी बोलल्यानंतर मन अगदी प्रसन्न होऊन जातं.”

शांता: “तुम्ही तर रडत होत्या आत्ता.”

वृंदा: “फोनवर बोलताना रडत होते गं. देवाला माझ्या मुलीविषयी विचारात होते. पण त्याच्याशी बोलल्यावर थोड्या वेळाने मन अगदी शांत, प्रसन्न होतं. आत कोणीतरी दिवा लावून गेल्यासारखं.”

शांता: “काय बोलला देव... फोनवर?”

वृंदा: “खूप काही बोलतो तो. आजकाल कसा लोकांकडे देवासाठी वेळ नाही असं म्हणत होता आत्ता.”

शांता: “त्ये खरं हाये बघा. मी बी ह्यांना कवापासन म्हणतीया... वैष्णोदेवीला जाऊ म्हणून. पण यांला वेळच न्हाई. आता मी ठरवलीय. पोराला घेऊन येकटीच जाणार हाय मी येष्टीने. यात्रा कंपनी बरोबर. आमच्या आजूबाजूच्या धा  बारा बायकाबी जनार हायत.”

वृंदा: “कधी जाणार आहेस तू? आधी सांगून जा.”

शांता: “अजून येळ हाय. फुडच्च्या महिन्यातली तारीख हाय. मी पैसे भरले की सांगील तुमास्नी. आता सैपाकाचं सांगा...”

(स्वैपाकघरात जाते. बेल वाजते. वृंदा दार उघडते. राजेश आत येतो. हातात सामानाची पिशवी.)

राजेश: “आटा नाही मिळाला. संपला होता. उद्या पाठवतो म्हणाला.”

वृंदा: (तंद्रीत) “अं? हां!”

राजेश: “बरं, जायचंय का चायनीज मध्ये डिनरला?”

वृंदा: “अं? नको. आज नको.”

राजेश: “पण आजंच जायचं ठरलं होतं ना? आनंदला खायचं होतं ना?”

वृंदा: “हो, पण आज... एकादशी आहे.”

राजेश: “मग? काय होतं एकादशी असेल तर?”

वृंदा: “विष्णूची तिथी असते. लोक उपवास करतात.”

राजेश: “करू देत. आपण कधीपासनं एकादशी पाळायला लागलो?”

वृंदा: “कधीतरी देवाची आठवण केली तर काय बिघडतं?”

राजेश: “काही नाही. मिकी माउस... dracula... परग्रहावरचे रहिवासी.... कोणाचीही आठवण करावी.”

वृंदा: “देव काल्पनिक नाहीये.”

राजेश (उपरोधाने): “हो, बरोबर. आता तर तो फोनही करतो नाही का!”

वृंदा: “थोडा विश्वास ठेवला तर काय बिघडतं का?”

राजेश: “नसलेल्या गोष्टीवर कसा विश्वास ठेवायचा?”

वृंदा: “पण कशावरून देव नाही?”

राजेश: “तो आहे याला पुरावा काय?”

वृंदा: “पुराव्याचा अभाव हा अभावाचा पुरावा असू शकत नाही.”

राजेश: “पुराव्याशिवाय कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवणं याला अंधश्रद्धा म्हणतात.”

(बेल वाजते. कोणीच दार उघडत नाही.)

वृंदा: “अंधश्रद्धा नाही आहे ही. विश्वास आहे माझा देवावर... आत्म्यावर... पुनर्जन्मावर... पुन्हा जन्म घेणार आहे मी... आणि श्रुती सुद्धा... माझी मुलगी म्हणून... आई होणार आहे मी तिची...”

(पुन्हा बेल वाजते. शांता आतून येऊन दार उघडते. आनंद आत येतो.)

वृंदा: “तुझा नसेल विश्वास पण माझा आहे. खात्री आहे माझी. तीव्र इच्छा असेल तर शक्य आहे ते... विठ्ठलाने सांगितले आहे मला.”

राजेश: “कोणातरी भोंदू मवाल्याला देव समजण्या इतकी मूर्ख नाहीस तू. सावर स्वतःला आणि कोणाही ऐऱ्यागैऱ्या माणसाशी फोनवर बोलू नकोस.”

वृंदा: “मूर्ख तू आहेस. श्रुतीला परत मिळवायचा अध्यात्म हाच एक मार्ग आहे. आयुष्यात एवढी मोठी tragedy होऊन देखील तुझं मन अजूनही ऐहिक सुखातच रमतं.”

(आनंद अस्वस्थ होऊन त्यांचं भांडण बघत उभा आहे.)

राजेश: “मग काय जगणं सोडून देऊ? तुझ्यासारखा hypocrite नाही आहे मी. जगण्यावरची इच्छा गेली म्हणायचं आणि चांगले चांगले कपडे घालून ऑफिसला जायचं.”

वृंदा: “Hypocrite नाही आहे मी. माझ्या तडफडणाऱ्या मनाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न असतो तो माझा. जे घडलं त्याच्याने उद्ध्वस्त झालेल्या मनाला कसबसं तगवून धरण्याचा प्रयत्न असतो तो. पोकळी भरून काढण्यासाठी वरवर केलेली डागडुजी असते ती.”

राजेश: “हे असं सारखं कुढत बसलं की कोणीही फोन करतं आणि काहीही थाप मारून गंडवत...”

वृंदा: “काय गंडवलं? काय गंडवलं कुणी मला?”

राजेश: “विचार कुणालाही...”

(पहिल्यांदाच दोघांच्याही आनंद तिथे असल्याचे लक्ष्यात येते.)

राजेश: “... आनंदला विचार.”

आनंद: “गाडी गारेज मध्ये पार्क केली आहे मावशी.”

(गाडीची किल्ली तिच्या हातात देतो.)

आनंद: “क्लच पूर्ण झिजला होता. बदलावा लागला...”

(क्षणभर तिघेही स्तब्ध. वृंदा राजेशकडे अर्थपूर्ण कटाक्ष टाकून आत निघून जाते. आनंद जिन्याने वर जाऊ लागतो.)

राजेश: (आनंदला उद्देशून) “गाडी सर्विसिंगला आलीच होती... दर वेळी कोणता ना कोणता पार्ट बदलावाच लागतो...”

रंगमंचावर हळूहळू अंधार.

# प्रवेश ३

वृंदाचा दिवाणखाना. सकाळची वेळ. वृंदा नुकतीच आंघोळ करून आली आहे. ऑफिसला जाण्याच्या गडबडीत आहे. फोन, किल्ली वगैरे वस्तू पर्स मध्ये भरत आहे. बेल वाजते. वृंदा दार उघडते. शांता आत येते.

वृंदा: “अग? इतक्या लवकर कशी आलीस? तुला मी दुपारी येऊन आनंदसाठी स्वयंपाक करायला सांगितलं होतं.”

शांता: “दुपारी येईन हो मॅडम. आत्ता माझ्या शेजारी राहणाऱ्या मुलीला घेऊन आले आहे. तुमच्या पाया पडायला. ये गं मीना.”

(एक सोळा सतरा वर्षाची मुलगी आत येते. वृंदाच्या पाया पडते.)

वृंदा: “अगं, अगं! हे काय? कोण ही मुलगी? माझ्या पाया कशाला पडते आहे?”

शांता: “माझ्या शेजारी राहते ही मॅडम. हिला आई न्हाई. बापाने दुसरं लग्न केलं हाय. हिची सावत्र आई लय बोलती हिला. लग्न होत न्हाई म्हणून शिव्या देती. ही बिचारी रंगानं काळी सावळी हाय. पर लई उपास तपास करती नव्हरा मिळावा म्हणून. परवा यक मुलगा बघायला आला व्हता. ही नवस बोललीया राधा कृष्णाच्या देवळात. तिकडेच चालली व्हती. म्या म्हटलं जाताजाता आधी मॅडम च्या पाया पड. त्या देव माणूस हायत. देव बोलतो त्यांच्याशी.”

वृंदा: “अगं, पण मी काय देव आहे का? माझ्या पाया कशाला पडायच्या? आणि लग्न होत नाही तर नोकरी करून चार पैसे का कमवत नाही? शिकली आहे का नाही?”

शांता: “आता सावत्र आई काय शिकू देणार? लहानपणापासनंच घरातल्या कामाला जुंपली हाय तिला. यक दोन घरात भांडी, सफाई करती. लग्न झालं तर सुटेल बघा आईच्या जाचातून. पड गं, मॅडम च्या पाया पड.”

(मीना पुन्हा वृंदाला वाकून नमस्कार करते.)

वृंदा: “कल्याण होऊन दे. शांता, मी काही देव माणूस वगैरे नाही गं. देवळात जाते आहेस तर मनोभावे देवाला नमस्कार कर. चांगला नवरा मिळू दे म्हणावं. आणि काहीतरी कोर्स वगैरे करून नोकरी कर. पैशाची काही मदत लागली तर सांग मला... आणि... एक मिनिट थांब...”

(वृंदा आत जाते आणि दोन चाफ्याची फुलं घेऊन येते.)

वृंदा: “हे घे. कुंडीतल्या चाफ्याला फुलं आली आहेत दोन. देवळात वाहा देवाला. चल. शांता, निघते मी. उशीर होतोय ऑफिसला. आनंद अजून झोपला आहे. दुपारी येऊन त्याच्यासाठी पोळी भाजी करून जा.”

शांता: “व्हय मॅडम. येईन मी.”

(शांता आणि मीना जातात. वृंदा पर्स घेऊन निघते. दार ओढून घेते.)

(आनंद टॉवेल ने तोंड पुसत जिन्यावरून खाली येतो. फोन लावतो.)

आनंद: “सोनाली? हाय! झाली का सगळी तयारी? मावशी आत्ताच गेली ऑफिसला. तू कधी येते आहेस? लवकर ये. हो. मी आठवण करतो अंकल ना. तू ये लवकर.”

(आतून राजेश येतो. तो ऑफिसला जाण्याच्या तयारीत आहे.)

आनंद: (फोनवर) “ठीक आहे, बाय!”

आनंद: (राजेशला उद्देशून) “अंकल, लक्षात आहे ना? आजच आहे पार्टी. लवकर या. आम्ही सगळी तयारी करून ठेवतो.”

राजेश: “अरे, म्हणजे काय! लक्षात आहेच माझ्या. वृंदाचा वाढदिवस कसा विसरेन मी? आज सकाळी शुभेच्छा दिल्या ना मी तिला. पण पार्टीचा पत्ता लागू दिला नाही. मी येईनच वेळेवर. निघतो आता.”

आनंद: “बाय!”

रंगमंचावर अंधार.

# प्रवेश ४

वृंदाचा दिवाणखाना. आनंद आणि सोनाली पार्टीची तयारी करत आहेत. दाराला, भिंतीला रिबिनी, रंगीत फिती लावत आहेत.

सोनाली: “अरे, तिकडे नाही ती फीत लावायची. ही गुलाबी आणि जांभळी अशी पीळ देऊन तोरणासारखी लावायची. तू इकडे ये. ही चिकट पट्टी मला कापून दे. मी लावते फिती.”

(आनंद तिने सांगितल्याप्रमाणे करतो.)

सोनाली: “आणि ते मी तिकडे glitter showers ठेवले आहेत. ते केक कापायच्या वेळी उडवायचे. तीन-चार लहान मुलं येणार आहेत पार्टीला, त्यांच्याकडे देऊ ते काम.”

आनंद: “सोनाली, आवडेल ना गं मावशीला अशी surprise party?”

सोनाली: “का नाही आवडणार? बघ तू संध्याकाळी. काय धमाल येणार आहे.”

आनंद: “त्याचंच तर थोडं टेन्शन आलंय गं.”

(सोनाली स्टुलावर चढून फीत लावत असते, ती खाली उतरते.)

सोनाली: “म्हणजे?”

आनंद: “म्हणजे हे असं धमाल वगैरे करणं मावशीच्या स्वभावाविरुद्ध आहे.”

सोनाली: “अरे त्या स्वतःहून काही करत नसतील... पण आपल्या बरोबर वाढदिवस साजरा करायला नक्कीच आवडेल त्यांना.”

आनंद: “हं... I hope so.”

सोनाली: “तू कशाला इतका depressed झाला आहेस?”

आनंद: “नाही, depressed मुळीच नाही. उलट फार excited आहे मी आजच्या पार्टीसाठी. पण आपल्याला मावशीचं दुःख नाही समजू शकणार सोनाली. तिच्या आयुष्यात जे घडलं त्याच्यानं अख्खं आयुष्य बदलून जातं माणसाचं. आपल्याला ज्या गोष्टी आनंददायक वाटतात त्या गोष्टी अशा व्यक्तींना निरर्थक वाटू शकतात.”

सोनाली: “मला नाही वाटत मावशी इतक्या विमनस्क अवस्थेत जगतायत असं.”

आनंद: “असं वरवर दिसत नाही कुणाचं दुःख सोनाली. पण ते फार खोलवर दडपलेल असतंच. मला काळजी वाटते मावशीची कधीकधी.”

सोनाली: “चल, काहीतरीच. तू जरा जास्तच emotional होतो आहेस.”

(पुन्हा खोलीची सजावट करू लागते. आनंद ही तिला मदत करायला लागतो.)

आनंद: Emotional नाही. गेले काही दिवस ती जे काही मला सांगते आहे, त्यावरून वाटतेय काळजी.”

सोनाली: “काय सांगते आहे?”

आनंद: “मावशीला वाटतंय की तिला विठ्ठलाचा फोन येतो. देव बोलतो तिच्याशी.”

सोनाली: “कुणाचा फोन येतो?”

आनंद: “पंढरपूरच्या विठ्ठलाचा. देवाचा.”

सोनाली: “असं का वाटतं त्यांना?”

आनंद: “तेच तर काळत नाही आहे. देव या संकल्पनेवर बोलते म्हणे ती देवाशी.”

सोनाली: “मला तर वाटलं होतं मावशी आणि अंकलचा देवावर विश्वास नाहीये.”

आनंद: “अंकलचा नाहीये. मावशीचा आहे. म्हणजे विश्वास ठेवणं ही तिची गरज आहे. आत्मा, पुनर्जन्म यावर विश्वास ठेवल्याशिवाय तिला तिची मुलगी परत भेटण्याची आशाच करता येणार नाही. आणि त्यासाठी काहितरी पुरावा शोधण्यासाठी तिचं मन प्रयत्न करत असावं.”

सोनाली: “पण मग देवाचा फोनंच का? आणि विठ्ठलाचाच का? तू ऐकलंस का त्यांना असं देव समजून कोणाशी बोलताना?”

आनंद: “नाही, ऐकलं नाही. पण पंढरपूरहून आलेल्या फोनचं रेकॉर्ड आहे तिच्या फोनवर. पण त्यातल्या एकाही नंबरवर फोन लागत नाही.”

सोनाली: “म्हणजे फोन खरंच आले होते?”

आनंद: “कोणीतरी mischief करायला करत असेल गं फोन. आपण शूटिंग साठी गेलो होतो ना पंढरपूरला! तेच तिच्या मनात बसलं आहे.”

सोनाली: “एक मिनिट. म्हणजे मावशीला खरोखरंच पंढरपुराहून call आले आहेत. आणि बोलणारी व्यक्ति त्यांच्याशी देव या संकल्पनेवर बोलते...”

आनंद: “अगं, मनाचे खेळ आहेत हे तिच्या...”

सोनाली: “पुन्हा जर का फोन आला... विठ्ठलाचा... तर रेकॉर्ड करून ठेवायला सांग मावशीना. आपणही ऐकू देवाचा आवाज...”

आनंद: “आणि तो आवाज देवाचाच आहे याची कशी खात्री करणार आपण?”

सोनाली: “खात्री करण्यासाठी नाही म्हटलं मी. ही काय सिद्ध करण्याची गोष्ट नाही. मावशीना जर खात्री आहे तर ते खरं आहे असं समजायला काय हरकत आहे? मावशी फार चांगल्या आहेत असं सगळेच म्हणतात. त्या पुण्यात्मा आहेत असं माझी आईही म्हणते.”

आनंद: “म्हणजे मावशीला खरंच देवाचा फोन येतो, ती देवाशी बोलते हे खरं वाटतंय तुलाही?”

सोनाली: “देव या संकल्पनेविषयी भौतिक जगातल्या खऱ्या खोट्याच्या व्याख्या लागू पडत नाहीत.”

आनंद: “पण ती संकल्पना जेंव्हा एखाद्या व्यक्तीच्या भौतिक जीवनाच्या पातळीवर येते, भौतिक वास्तवात ढवळाढवळ करते तेंव्हा अशा व्यक्तीला जग वेड ठरवतं.”

सोनाली: “हे म्हणजे अतिरेकीच झालं. बरं, समजा त्यांना भास होतो... किंवा त्यांचं मन काहितरी आधार शोधत आहे... कुठे काय बिघडलं त्यामुळे? आणि आता इतक्या वर्षांनंतर त्यांचं मन इतकं हळवं असेल असं मला नाही वाटत.”

(बेल वाजते. आनंद दार उघडतो. शांता आत येते.)

सोनाली: “आलात का शांताबाई? चला. स्वयंपाकघरात बरंच काम आहे.”

रंगमंचावर अंधार...

# प्रवेश ५

वृंदाचा दिवाणखाना. संध्याकाळची वेळ. बेल वाजते आणि पाठोपाठ स्वतःच्या किल्लीने दार उघडून वृंदा आत येते. पर्स ठेवते. सोफ्याच्या दिशेने येऊ लागते इतक्यात ‘हैप्पी बर्थडे टू यू ...’ असे रेकॉर्ड केलेले गाणे ऐकू येऊ लागते. ती आश्चर्याने इकडे तिकडे बघते, आतून अचानक पंधरा वीस लोक येतात आणि ‘surprise!’ ‘हैप्पी बर्थडे’ अशा तिला शुभेच्छा देतात. सगळे टाळ्या वाजवतात. वृंदा आनंदाने सगळ्या शुभेच्छांचा स्वीकार करते. थोडी आश्चर्याने गोंधळलेली, बावरलेली पण आहे. आनंद तिला हाताला धरून सोफ्यावर बसवतो. सगळेजण दिवाणखान्यात बसतात. वृंदा आश्चर्याने, प्रश्नार्थक मुद्रेने राजेशकडे बघते. तो आनंद आणि सोनालीच्या दिशेने निर्देश करतो.

वृंदा: “हे काय सगळे? पार्टी प्लान केलीत आणि मला कळले सुद्धा नाही!”

आनंद: “अगं, surprise द्यायचं होतं ना तुला!”

सोनाली: “अंकल पण आमच्या कटात सामील होते हां. त्यांनीच तर सगळ्यांचे नंबर दिले.”

पाहुणी १: “पन्नासाव्या वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा!”

(शांता ड्रिंक्सचे ग्लास घेऊन येते. राजेश सगळ्यांना ड्रिंक्स देऊ लागतो. बेल वाजते. आनंद  दार उघडतो. आणखी पाहुणे येतात. पुन्हा शुभेच्छा. वृंदा पुन्हा आश्चर्य व्यक्त करते.)

वृंदा: “मला कळलंच नाही... सगळं या मुलांनीच प्लान केलं.”

(सगळे पाहुणे एकमेकांशी बोलत आहेत. पार्टीला रंग चढू लागतो. शांता एकेक खाण्याचे पदार्थ घेऊन येऊ लागते. आनंद, सोनाली

आग्रहाने वृंदाला, पाहुण्यांना खाऊ घालतात. पुन्हा बेल वाजते. आनंद दार उघडतो. आणखी पाहुणे येतात. यात सोनालीचे आई-वडील ही आहेत. सोनाली त्यांची वृन्दाशी, राजेशशी ओळख करून देते. दिवाणखाना आता भरला आहे. काही लोक उभे आहेत. हास्य-विनोद चालू आहेत. आनंदी पार्श्वसंगीत चालू आहे. सर्व पाहुण्यात एक काळा-सावळा तरतरीत चाळीस वर्षाचा माणूस पुढाकार घेतो आहे. आनंद-सोनाली बरोबरच तो ही वृंदाला, पाहुण्यांना खाण्याचा आग्रह करतो आहे.)

सोनाली: “केक कापूया आधी. मी केक आणते.”

(केक-केक चा गलका होतो. सोनाली आत जाऊन केक आणते. त्यावर मोठी ५० च्या आकाराची मेणबत्ती पेटवलेली आहे.)

पाहुणी २: “किती मेणबत्त्या लावायच्या गं वृंदा? तुझं सांगायचं वय काय?”

(सगळे हसतात.)

पाहुणा ३: “पंचवीस”

पाहुणा ४: “एकोणीस”

(सगळे केक भोवती जमा होतात. वृंदा मेणबत्ती फुंकून केक कापण्यासाठी सज्ज होते.)

सावळा माणूस: “थांबा... थांबा... एक मिनिट. काका तुम्ही इकडे या. काकू तुम्ही इथे, या अशा उभ्या राहा. सोनाली, तू मावशी शेजारी. हां! वृंदा मॅडम तुमचा फोन द्या. मी काढतो फोटो. हं. रेडी. Say cheese! गुड. आता फुंका मेणबत्ती.”

(वृंदा मेणबत्ती फुंकते. सगळे 'हैप्पी बर्थडे टू यू' चं गाणं म्हणतात. मुलं glitter showers उडवतात. सगळयांच्या अंगावर चमकीचा वर्षाव होतो. वृंदा केक कापते. सावळा नायक फोटो काढत राहतो. 'हैप्पी बर्थडे' चं गाणं चालूच असतं. 'Many boyfriends to you…')

राजेश: “Many boyfriends नाही हं... girl friends चालतील.”

(सगळे हसतात.)

सावळा नायक: “आम्ही सगळे friends च तर आहोत.”

(पुन्हा सगळे हसतात. एकेक जण भेटवस्तू देतो. सावळा नायक एक सुंदर बास्केट देतो. भेटवस्तू वृंदाला देण्यासाठी लोकांची एकच गर्दी होते. सावळा नायक फोटो काढत रहातो.)

राजेश: “आणि आता माझं खास present.”

(style मध्ये वृंदाच्या हातात एक पाकीट ठेवतो. त्याच्याकडे बघत वृंदा पाकीट उघडते आणि आश्चर्याने आनंदित होते. सगळे 'काय आहे?' 'राजेशचं खास present काय आहे' असं विचारतात.)

राजेश: “कॅम्बोदिया च्या ट्रीपची तिकिटं. वृंदाची बऱ्याच दिवसांपासूनची इच्छा आहे कॅम्बोदियाला जाऊन अंगकोर वाट बघायची.”

(कॅम्बोदिया बद्दल चर्चा सुरु होते. सगळे जण ऐकीव माहिती, सल्ले देऊ लागतात.)

पाहुणा १: “हॉटेल वगैरे नीट बघून बुक करा हां. South आशियातील देशांचा काही नेम नाही. तिथल्या हॉटेल्स वर कसला अड्डा असेल ते सांगता येत नाही.”

पाहुणा २: “कॅश जास्त नेउच नका. क्रेडिट कार्ड असलं म्हणजे झालं.”

पाहुणी ३: “तिकडचंच सिम कार्ड घ्या. नाहीतर रोमिंगचं बिल फार येतं.”

पाहुणी ४: “शॉपिंग काय काय करणार तिथे?”

पाहुणा ५: “तिकडे जरा जपूनच हो. फार लुबाडतात ते लोक टुरिस्ट ना.”

सावळा नायक: “तुम्ही गेलाय काका कॅम्बोदियाला?”

पाहुणा ५: “मी नाही गेलो... पण ऐकलंय.”

सावळा नायक: “चला. आता थोडी entertainment होऊन जाऊ दे. एक खेळ खेळूया. सर्वांनी डोळे मिटायचे. मी एका डिश मध्ये एक पदार्थ घेऊन येणार आहे, प्रत्येकाने डिश हातात घ्यायची पण डोळे नं उघडता नुसत्या वासावरून पदार्थ ओळखायचा. मग डिश पास करायची. सगळयाचं ओळखून झालं की डोळे उघडून बघायचं. रेडी?”

(सगळे उत्साहाने तैय्यार होतात. सावळा नायक आतून एका डिश मध्ये एक पदार्थ घेऊन येतो. डिश फिरवली जाते बऱ्याच पदार्थांची नावे घेतली जातात. शेवटी नायक सर्वांना डोळे उघडायला सांगतो. पदार्थ असतो पापडी चाट. बहुतेकांनी त्यातले काही घटक ओळखले असतात.)

नायक: “बरं, आता गाण्याची महफिल होऊन दे. पहिल्यांदा कोण म्हणतंय?”

(कोणीच पुढाकार घेत नाही.)

नायक: “सोनाली, तू म्हण.”

सोनाली: “मी? मला कुठे गाणं म्हणता येतं?”

नायक: “भजन सुंदर म्हणतेस की. सुरुवातीला गणेश स्तुती होऊन जाऊ दे.”

(सोनाली छोटासा श्लोक चालीवर म्हणते.)

नायक: “दामले काका, तुम्ही म्हणा ते देवानंदच गाणं... ‘धीरे धीरे चल, चांद गगन मे...’

(दामले काका हसत हसत ते गाणं थोडसं म्हणतात. सोनाली आत जाते.)

नायक: “राजेश, आता तुमची पाळी. अगदी खास गाणं पाहिजे वृंदा मॅडम साठी...”

राजेश: “मी? आणि गाणं? मला फक्त ऐकता येतं.”

नायक: “अरे, असं कसं चालेल? पन्नासावा वाढदिवस आहे वृंदा मॅडम चा. त्यात आणि surprise पार्टी. आज गाण्याचं पण surprise द्या त्यांना.”

राजेश: “मी कधी आयुष्यात गाणं म्हटलं नाही...”

नायक: “मग आज म्हणा... तुम्ही सुरुवात करा. मी देतो साथ तुम्हाला...”

(राजेश सुरुवात करतो. नायक साथ देतो. दोघे मिळून दोन तीन ओळी म्हणतात.)

सोनाली: (आतून बाहेर येत) “जेवण तयार आहे. चला सगळ्यांनी... आत बुफे मांडलाय.”

(सगळे उठून आत जायला लागतात. रंगमंचावर अंधार.)

# प्रवेश ६

वृंदाचा दिवाणखाना. पार्टीच्या खाणाखुणा दिसताहेत पण बहुतेक सगळे पाहुणे निघून गेले आहेत. सोनालीचे आई-वडील निरोप घेताहेत.

वृंदा: “खूप खूप बरं वाटलं तुम्ही आलात म्हणून. त्या निमित्तानं तुमची भेट झाली.”

सोनालीची आई: “आमची पण इच्छा होती किती दिवसांपासून तुम्हाला भेटायची. आता लवकरच घरी या. सोनालीच घेऊन येईल तुम्हाला.”

सोनालीचे वडील: “पुन्हा एकदा वाढदिवसाच्या शुभेच्छा.”

सोनाली: “मी इथेच थांबतेय आज आई. पार्टीची सगळी आवरा आवर करून उद्या येईन.”

(सोनालीचे आई-वडील पुन्हा पुन्हा निरोप घेऊन निघून जातात. सोनाली, आनंद, वृंदा आणि राजेश सोफ्यावर येऊन बसतात. सगळे दमलेले पण खूप आनंदी आहेत.)

वृंदा: “किती दिवसांनी इतकं enjoy केलं मी. तुम्हा सगळ्यांना खूप खूप thank you.”

राजेश: “सगळं सोनाली आणि आनंदचं planning.”

सोनाली: “आयडिया आमची पण अंकलने ही खूप मदत केली हां. सगळ्या पाहुण्यांची यादी करून त्यांचे फोन नंबर त्यांनीच दिले.”

वृंदा: “हे सगळे लोक आपल्या घरी माझ्या वाढदिवसासाठी येतील असं मला कधी सांगितलं असतं तर खरंच वाटलं नसतं.”

सोनाली: “पण खरंच. किती मजा आली. सगळयांनीच enjoy केलं.”

वृंदा: “आणि तो तुझ्या आई-वडिलांबरोबर आला होता तो कोण?”

सोनाली: “आई-बाबा तर दोघेच आले होते. स्वतःच गाडी घेऊन आले होते.”

वृंदा: “तो गं... त्यांच्याबरोबर आला होता ना... तो फोटो काढत होता तो.”

सोनाली: “नाही. तो तर इथला तुमच्या कॉलनीतलाच ना?”

राजेश: “तो तुझ्या फोन ने फोटो काढत होता तो? माझ्याबरोबर गाणं म्हणणारा? तो आमच्या कॉलनीतला नाहीये. मला वाटलं सोनाली-आनंद ने बोलावलेल्या लोकांपैकी होता म्हणून.”

आनंद: “तो जीन्स आणि लाल टी शर्ट घातलेला तर event management कंपनी चा होता ना? सोनाली बोलावणार होती कुणाला तरी...”

सोनाली: “मी कुठे बोलावलं event management कंपनी ला? तशी नुसती मी कल्पना सुचवली होती सुरुवातीला. मग नंतर आपलं मित्तल्स ना केटरिंग द्यायचं ठरलं. मग मी contact नाहीच केलं कुठल्या कंपनीला.”

वृंदा: “मग कोण होता तो?”

सोनाली: “मला वाटलं तुमचा कलीग होता तो मावशी. तुम्हाला सगळयांना ओळखत होता ना तो!”

आनंद: “मग तू भजन म्हणतेस हे कसं माहीत होतं त्याला? तू गाणं म्हणताना मी देखील कधी ऐकलं नाहीये.”

राजेश: “असेल कुणी तरी. Entertain केलं मात्र हं त्याने भरपूर.”

वृंदा: “अरे, असेल कुणीतरी म्हणजे काय? एक अनोळखी माणूस आपल्या घरी येऊन दोन तास बसून, जेवून जातो आणि तो कोण हे सुद्धा आपल्याला माहीत नाही?”

राजेश: “अग आता एवढ्या मोठ्या पार्टीत आम्ही तिघांनी वेगवेगळया लोकांना बोलावलं. असेल कुणाच्या तरी घरी आलेला पाहुणा... आला असेल त्यांच्या सोबत...”

(आनंद वृंदाचा फोन बघतो आहे.)

राजेश: “बघू तुझा फोन. त्यात फोटो आहेत. त्यात कोणाच्या बरोबर आला ते असेल कदाचित.”

आनंद: (राजेशकडे फोन देत) “मी बघितले फोटो. छान फोटो आलेत सगळे. त्यानेच काढलेले. पण त्याचा एकही फोटो नाहीये. माझ्या फोनमध्ये पण नाही.”

सोनाली: “आपण presents बघू. त्याने दिलेल्या present वर त्याचं नाव असेल.”

(सोनाली आणि आनंद सगळी presents सोफ्यावर वृंदाच्या समोर आणून ठेवतात. एकेका present वरची नावं वाचतात. वृंदा त्या त्या नावाला प्रतिसाद देते.)

वृंदा: “हो, बरोबर... सुराणानी हे दिलं..., मिसेस मेहतानी हे मोठं present दिलं...” (वगैरे)

सोनाली: “झाली सगळी बघून. आता फक्त ही बास्केट राहिली आहे. नावाची चिठ्ठी नाहीये त्याच्यावर.”

वृंदा: “बघू. मला वाटतंय तेच आहे का...”

(बास्केट उघडते. चाफ्याचा सुगंध दरवळतो.)

वृंदा: “चाफ्याची फुलं. मला आवडतात ती... तो फक्त सुगंध मागे ठेवून गेला...”

राजेश: “वृंदा... काय म्हणायचंय काय तुला? कळलं का कोण होता तो ते?”

वृंदा: “हो आणि नाही. त्याने खेळलेल्या game सारखाच. आपल्या सगळयांचेच डोळे मिटलेले आहेत. आपल्या आपल्या कल्पना शक्तीप्रमाणे तो आपल्याला निरनिराळा वाटतो. ज्याला जसा हवा तसा भेटतो.”

राजेश: “कोण?”

वृंदा: “विठ्ठल.”

राजेश: (चिडून) “हा तो फोन करणारा होता? त्याची एवढी हिम्मत!”

वृंदा: (हातानेच त्याला शांत करते) “आता फोन येणार नाहीत.”

आनंद: “मावशी, तू दमली आहेस. झोप निवांत आता. मी आणि सोनाली आवरतो आतलं सगळं.”

(वृंदा मानेनेच हो म्हणते. आनंद आणि सोनाली आत जातात.)

राजेश: “वृंदा, I think...”

वृंदा: “माझी काळजी करू नको राजेश. मी ठीक आहे. श्रुती गेली त्याला इतकी वर्षं झाली. दुःख उराशी बाळगून जगण्याचं तंत्र समजलंय मला. मी इतक्या वर्षात कधीच कोलमडून गेले नाही... आणि आत्ताही माझं मन शाबूत आहे. माझी श्रद्धा तुला समजणार नाही. ती समजावी असाही माझा

आग्रह नाही. पण आता ती श्रद्धा माझ्या मनात आणखीच दृढ झाली आहे. आता एक प्रकारची शांती लाभली आहे माझ्या मनाला.”

राजेश: “रात्र बरीच झाली आहे वृंदा... दगदग ही झाली आहे. आता विश्रांती घे.”

(आत जायला निघतो.)

वृंदा: “हो, आलेच.”

(राजेश आत जातो.)

वृंदा: (विठ्ठलाला उद्देशून) “तू आलास, आणि मी तुला ओळखलेच नाही. तू म्हणालास ते खरं होतं. देवळात स्तब्ध उभ्या असलेल्या दगडाच्या निर्जीव मूर्तीला देव मानणं सोपं असतं. पण माझ्या मित्रमैत्रिणींच्या घोळक्यात आलास, माझ्याशी बोललास, माझ्या घरी जेवलास पण मी तुला ओळखलंच नाही. आता पुन्हा तुझा फोन येणार नाही हे मला माहीत आहे. पण असाच भेटत रहा. नकळत. सामान्य माणूस होऊन. आणि मी बोलत राहीन तुझ्याशी अखंड. सांगत राहीन तुला माझ्या इच्छा, आकांक्षा... माझी स्वप्न... माझं ध्येय. आणि माझ्या इच्छाशक्तीतून घडवत राहीन माझं भविष्य. सांधेन एक पूल तुझ्यापर्यंत पोचण्याचा. तू भेटत रहा... मी ओळखलं नाही तरी भेटत रहा...”

पडदा पडतो.

समाप्त

**ई साहित्य प्रतिष्ठान** दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची बारा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक "स्वांतःसुखाय" लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या "साहित्यरत्नांचिया खाणीं" मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत
अध्यक्ष
ई साहित्य प्रतिष्ठान